कर्नाटक सरकार

# मराठी सरिता

## तृतीय भाषा पाठ्यपुस्तक
## Marathi Third Language

# 10

## TENTH STANDARD

## भाग - 2

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**Karnataka Textbook Society (R.)**
6th Cross, Malleshwaram, Bengaluru - 560 003.

# अनुक्रमणिका

## भाग : 2

## गद्य विभाग


| अ.क्र. | पाठाचे नाव | लेखक/लेखिका | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6. | श्रमावर प्रेम करूया | अरविंद वैद्य | प्रबोध कथा | श्रम महात्म्य | 1 |
| 7. | मेरी क्युरी | शारदा साठे | व्यक्तीचित्रणात्मक लेख | धैर्य, चिकाटी | 7 |
| 8. | टँकर आला हो अंगणी | अविनाश ओगले | विनोदी विडंबनात्मक लेख | पाण्याचे महत्त्व | 15 |
| 9. | क्रांतिवीर चाफेकर बंधू | दत्ता टोळ | लघुकथा | देशभक्ती, राष्ट्रप्रेम | 21 |
| 10. | सत्य | विनोबा भावे | वैचारिक लेख | सत्यनिष्ठा | 28 |


## पद्य विभाग


| अ. क्र. | कवितेचे नाव | कवी / कवयित्री | साहित्य प्रकार | मूल्य | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 6. | या काळाच्या भाळावर | उत्तम कोळगांवकर | स्फूर्तिगीत | उज्ज्वल भविष्याची आस | 35 |
| 7. | बाप म्हणायचा | इंद्रजित भालेराव | ग्रामीण कविता | भूतदया | 43 |
| 8. | लपे करमाची रेखा | बहिणाबाई चौधरी | अहिराणी कविता | अंधश्रद्धेवर प्रहार | 48 |
| 9. | दुष्काळ ओलाही कोरडाही | हर्षदा सुंठणकर | मुक्तछंद | वास्तवाची जाण | 52 |
| 10. | जादूगार | विंदा करंदीकर | नाट्यगीत | कुटुंबप्रेम | 57 |
| | व्याकरण – वृत्ते, | | | | 63 |
| | लेखन – पत्रलेखन, जाहिरातलेखन, वृतांतलेखन, अर्जलेखन, मुलाखत. | | | | 71 |
| | पूरकवाचन – 1) शिल्पा दऱ्याबा चव्हाण (कथा) | | | | 75 |
| | अपठीत उतारे – 4 | | | | 83 |


I6D9L6

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 6. श्रमावर प्रेम करुया

V2Z4B2

**परिचय** – **अरविंद वैद्य (जन्म 3 मार्च 1947)** शिक्षण एम. ए. बी. एड. सुरुवातीला सहाय्यक शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून काम केले आहे. ते माध्यमिक शिक्षक संघाचे माजी कार्यवाह होते. खाजगी प्राथमिक शिक्षक – 'शिक्षकेत्तर संघ, मुंबई' या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष होते. त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेऊन 1974 पासून सामाजिक चळवळींच्या कामासाठी कार्य सुरु केले. स्त्री – मुक्ती संघटनेचे ते कार्यकारणी सदस्य होते. 'जागतिक शिक्षणाचा सामाजिक इतिहास' व 'अमेरिकेचे परराष्ट्र धोरण' ही त्यांची पुस्तके आहेत. 'प्रेरक ललकारी', 'जागतिक नवे पर्व', 'पालकनीती' इत्यादी मासिकांमध्ये आजवर त्यांनी सातत्याने लेखन केले आहे.

प्रस्तुत पाठ त्यांच्या 'प्रबोध कथा' या पुस्तकातून निवडला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य : श्रम महात्म्य)

मी आज तुम्हाला जी पहिली गोष्ट सांगणार आहे ती सुमारे तीस वर्षापूर्वी वर्तमानपत्रात आलेली एक बातमी आहे. लंडन शहरातील एका स्टेशनवर काम करणाऱ्या हमालाची ही गोष्ट आहे. हे स्टेशन बहुधा लोकलचे स्टेशन असावे. कारण इथे येणारे प्रवासी हे नेहमी येणारे होते. रेल्वेच्या त्या हमालाचे काम नेहमीचेच ! स्टेशन साफ स्वच्छ ठेवणे आणि स्टेशनमास्तरांच्या आदेशाप्रमाणे इतर कामे करणे. पण हा हमाल थोडा वेगळा होता. त्याचे आपल्या कामावर अतिशय प्रेम होते. स्टेशन साफ स्वच्छ ठेवण्याबरोबरच तो ते सुंदर ठेवण्याचाही प्रयत्न करी. ऋतुमानाप्रमाणे स्टेशनवर फुलांच्या कुंड्या लावी. त्याला पाणी घाली. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रवाशांशी थोडेसे संभाषण करी. हा हमाल त्या स्टेशनचा एक अविभाज्य भागच बनला होता. अर्थात रेल्वे प्रशासनाला त्याचे काय ? त्या हमालाची तिथून बदली झाली. हमाल दुसऱ्या स्टेशनवर कामाला गेला.



त्या हमालाची बदली त्याला जरी खटकली नाही तरी स्टेशनवर नेहमी येणाऱ्या प्रवाशांना त्याचे नसणे खटकू लागले. नेहमीप्रमाणे स्टेशन साफ-सुंदर दिसेना. नेहमीचा एक ओळखीचा चेहरा त्यांचं हसून स्वागत करीना. हळूहळू प्रवाशांमध्ये त्याची चर्चा सुरु झाली. आणि त्या हमालाच्या बदलीच्या विरोधात एका चळवळीचा जन्म झाला. लवकरच त्या चळवळीच्या परिणामी त्या हमालाची बदली फिरवणे रेल्वे प्रशासनाला भाग पडले. हमालाचे काम ते काय ? परंतु कामावरच्या प्रेमामुळे मोठ्या अधिकाऱ्यांना जे भाग्य मिळाले नसते ते लोकांच्या प्रेमाचे भाग्य त्या हमालाला मिळाले होते.

आपल्या कामावर असं प्रेम करण्यासाठी एका दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. त्यासाठी तुम्हाला एक दुसरी गोष्ट सांगतो. एका ठिकाणी एक धरणाचे काम चालू होते. त्या धरणाच्या कामावर अनेक मजूर काम करत होते. एक दिवस ते काम बघायला काही मंडळी आली.

त्यातल्या एका माणसाने एका दगड फोडणाऱ्या कामगाराला विचारले,

© KEBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘तू काय करतो आहेस ?’’

तो कामगार म्हणाला, ‘‘पोटाची खळगी भरायला काहीतरी केले पाहिजे ना, ते करतो आहे.’’

त्या माणसाने तोच प्रश्न दुसऱ्या कामगाराला विचारला.

दुसरा कामगार म्हणाला,

‘‘मी दगड फोडतो आहे. मोठे कठीण काम आहे ते. पैसे मिळतात. ते केले पाहिजे.’’

तोच प्रश्न त्याने तिसऱ्या कामगाराला विचारला.

तिसरा कामगार म्हणाला, ‘‘आम्ही धरण बांधतो आहोत. हे धरण बांधून पूर्ण होईल तेव्हा या भागात नंदनवन फुलेल.’’

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



तीनही कामगारांची उत्तरे नीटपणे पाहिली तर तिघांच्या दृष्टिकोनाचा फरक आपल्या लक्षात येतो. काम तेच, पण दृष्टिकोनामुळे ते प्रत्येकाला वेगळे वाटत होते. पहिल्या कामगाराला पोटाची खळगी भरण्यासाठी केलेला उद्योग एवढेच कामाचे महत्व होते. दुसऱ्या कामगाराला आपण कोणते काम करतो आहोत याची जाणीव होती. आणि मिळणाऱ्या मोबदल्याचा पूर्ण लाभ प्रामाणिकपणे दिला पाहिजे या कर्तव्याचीही जाणीव होती. तिसरा कामगार खरे तर दगड फोडत होता पहिल्या दोघांसारखाच. पण त्याने मनाने धरण बांधण्याच्या सर्व प्रक्रियेला जोडून घेतले होते. आपण करत असलेल्या कामाचे महत्व आणि त्याचा सामाजिक परिणाम याची त्याला पूर्ण जाणीव होती. अशी पूर्ण जाणीव असलेला माणूसच आपल्या कामावर त्या रेल्वेच्या हमालासारखे प्रेम करु शकतो.

अर्थात काम करणारे आपल्या कामावर प्रेम करत नाहीत ही सर्वस्वी त्यांची चूक नसते. आजच्या समाजात ज्या रचनेत आपण काम करतो त्यातून कामापासून एक तुटलेपण आपोआपच तयार होते. आणि त्यामुळे बऱ्याचदा काम कंटाळवाणे, पोटाची खळगी भरण्यासाठी केलेले असे वाटू लागते. पण जरा विचार केला तर एक गोष्ट लक्षात येईल की ज्यांच्यासाठी आपण काम करतो, त्यांचे यामुळे काहीच नुकसान होत नाही. कामातली आपली मजा जाते. समाजाचे नुकसान होते. आणि काम करणाऱ्यांची संघटना देखील पोट भरण्याच्या वरवरच्या विचारात अडकून पडते. संपूर्ण रचनेचा समाजहिताच्या दृष्टीने विचार होत नाही. समाजहिताचा विचार करायचा तर प्रत्येकाने आपल्या कामावर प्रेम केले पाहिजे. मग त्या कामात आणि रचनेत काही दोष असतील तर त्या दोषांविरुद्ध लढण्याचे बळ त्या प्रेमातून आपल्याला प्राप्त होईल. कामावर प्रेम करणारेच अन्यायकारक रचनेविरुद्ध संघर्ष करु शकतात. इतिहास घडवू शकतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :** बातमी – वार्ता. श्रम – कष्ट. हमाल – ओझे वाहणारा मजूर. लंडन– इंग्लंडची राजधानी. लोकल – शहरात रोज धावणारी रेल्वे. प्रवासी – यात्री. साफ – स्वच्छ. ऋतूमान् – हवामान. संभाषण – संवाद. खटकणे – बोचणे, रुतणे. प्रशासन – एखाद्या संस्थेचा कारभार पाहणारी व्यवस्था. नशीब – दैव. दृष्टिकोन – बघण्याची नजर. धरण – नदीचे पाणी अडविण्यास बांधलेला मोठा बांध. पोट भरणे – उदरनिर्वाह करणे. नंदनवन फुलणे – सुख समृद्धी येणे. नंदनवन– स्वर्गीय बाग, इंद्राची बाग.

नुकसान – तोटा. मजा – गंमत. समाजहित – समाजाचे कल्याण. संघटना – संस्था, समिती. संघर्ष – लढा. पोटाची खळगी भरणे – भूक भागवणे.

## स्वाध्याय

### प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

1) श्रमावर प्रेम करूया या पाठात कोणाची गोष्ट सांगितली आहे ?

2) हमालाची बदली कोणाला खटकू लागली ?

3) हमालाच्या बदलीच्या विरोधात प्रवाशांनी काय केले ?

4) प्रवाशांच्या चळवळीचा परिणाम काय झाला ?

5) हमालाला कोणते भाग्य लाभले ?

6) समाजहिताचा विचार करण्यासाठी प्रत्येकांनी काय केले पाहिजे असे लेखकाला वाटते ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

### प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.

1) प्रवाशांतून चर्चा का सुरु झाली ?

2) पहिला व दुसरा कामगार कामे कशासाठी करतात ?

3) तू काय करतो आहेस ? या प्रश्नाला पहिल्या कामगाराने कोणते उत्तर दिले ?

4) बांधकामाची पाहणी करणाऱ्या मंडळीनी तू काय करत आहेस ? असे विचारले असता दुसऱ्या कामगाराने कोणते उत्तर दिले ?

5) तू काय करत आहेस ? असे तिसऱ्या कामगाराला विचारले तेंव्हा त्याने कोणते उत्तर दिले ?

6) तीन कामगारापैकी कोणत्या कामगाराचे उत्तर तुम्हाला योग्य वाटते ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) हमाल लंडन स्टेशनाचा अविभाज्य भाग कसा बनला?
2) हमालाचे व्यक्तीचित्रण करा?
3) तीन कामगाराच्या दृष्टिकोनात कोणता फरक होता?
4) आपल्या कामावर प्रेम न केल्याचा परिणाम काय होतो?

**भाषाभ्यास :**

**खालील शब्द वाचून त्या शब्दांचा शब्दसमूह लिहा.**

नंदनवन, समाजसेवक, धरण

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

पोटाची खळगी भरणे, नंदनवन फुलणे

**उपक्रम :**

1) डॉ. अरविंद वैद्य यांचे 'प्रबोधकथा' हे पुस्तक मिळवून वाचा.
2) शाळेत श्रमदान शिबीर घेऊन शाळा स्वच्छ व सुंदर करा.
3) विज्ञानातील प्रगतीमुळे विविध क्षेत्रात अनेक नवीन साधनांची भर पडली आहे त्याचा शोध घ्या खालील तक्ता पूर्ण करा.

| क्षेत्र | नवनवीन साधने |
|---|---|
| 1) बांधकाम | |
| 2) कृषीक्षेत्र | |
| 3) कृत्रिम बुद्धिमत्ता | |
| 4) संरक्षण | |
| 5) वैद्यकीय | |
| 6) शिक्षण | |

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# 7. दोन नोबेल पुरस्कारांची मानकरी – मेरी क्युरी

P3W1T6

**परिचय** – **शारदा साठे (जन्म 5 नोव्हेंबर 1944)** शिक्षण – बी.ए. (ऑनर्स) इंग्रजी साहित्याचा अभ्यास केला. सुमारे चाळीस वर्षे कामगार चळवळ, स्त्री–मुक्ती चळवळ अभ्यास, लाल निशाण पक्षात क्रियाशील. शिक्षण चेंबूर हायस्कूल मध्ये झाले. कामगार चळवळीत कायदा आघाडीचे काम पाहत असतानाच त्यांनी स्त्री–मुक्ती संघटनेच्या स्थापनेत व विस्तारात पुढाकार घेतला. ज्योती म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो' या नाटकाचा प्रसार केला. ग्रामीण कार्यकर्त्यांना एकत्र आणले. संघटनेने चालविलेल्या 'प्रेरक ललकारी' मासिकाच्या त्या संपादक आहेत. वृत्तपत्रांमध्ये व नियतकालिकांमध्ये स्फुट लेखन आणि 'प्रेरक ललकारी' मध्ये नियमित लेखन यामधून त्यांनी स्त्रीविषयक प्रश्नांवर भाष्य व प्रकट चिंतन केले आहे.

प्रस्तुत गद्य 'क्षितिजावरील शलाका' या पुस्तकातून संकलित केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – विज्ञाननिष्ठा आणि चिकाटी)



ज्या काळात भारतात डॉ. आनंदीबाई जोशी आणि डॉ. रखमाबाई यांचा जन्म झाला त्याच काळात मेरीचा जन्म पोलंडमध्ये झाला. ज्या काळात देशोदेशीचे ज्ञानसाधनेने झपाटलेले स्त्री–पुरुष अमेरिका, इंग्लंड, फ्रान्सचा रस्ता पकडत, त्याच काळात मेरी जन्माला आली ती जणू जगाला नवा प्रकाश उपलब्ध करून देण्यासाठी मेरीचे मूळ नाव मार्या स्क्लोडोव्हास्का. जन्म पोलंडची राजधानी वॉर्सामध्ये. तिचे वडील पदार्थविज्ञानशास्त्राचे तज्ज्ञ होते. ते वॉर्साच्या शाळेत शिकवत. तिची आई संगीततज्ज्ञ होती आणि वॉर्सात स्त्रियांच्या विद्यापीठात शिक्षिका होती. मेरीला दोन बहिणी आणि दोन भाऊ होते.

त्यावेळचे पोलंड हे रशियन साम्राज्याचा भाग होते. झारशाहीत पोलिश लोकांचे नागरी स्वातंत्र्य हिरावले गेले होते. पोलिश भाषा, त्यांची बोलण्याची ढब, सारे काही रशियनांच्या टिंगलटवाळीचे विषय होते. त्यामुळे प्रत्येक पोलिश नागरिक मनातून रशियन झारशाहीचा कट्टर द्वेष्टा बनलेला होता. मेरी आणि तिचे कुटुंब त्याला अपवाद नव्हते. रशियनांच्या दृष्टीने मेरीचे वडील पुरेसे आज्ञाधारक नव्हते. त्यामुळे त्यांनी मेरीच्या वडिलांचे पद काढून तर घेतलेच पण त्यांचा पगारही कमी केला. त्यामुळे मेरीच्या आईला घरात विद्यार्थ्यांकरीता खानावळ चालवावी लागली. त्यात मेरीची सर्वात मोठी बहीण सोफी सोळाव्या वर्षीच टायफॉइडची शिकार बनली. दोन वर्षात अतिश्रमाने आईला टीबीने घेरले. अठरा विश्वे दारिद्र्य आणि आजारपण यांत मेरीची आईही वारली. त्यावेळी मेरी अवघी अकरा वर्षांची होती. अशा परिस्थितीत तिचे शिक्षण सुरू होते. मेरी बुद्धिमान होती. शाळेत तिला सर्व बक्षिसे मिळत पण ती रशियन पुस्तके! मेरीचे मन बंडखोर होते आणि आपल्यापरीने रशियन झारशाहीबद्दलची घृणा व्यक्त करण्यात ती चुकत नसे. मेरी अधाशाप्रमाणे जे मिळेल त्याचा वाचून फडशा पाडायची.

वॉर्सामध्ये शाळा पूर्ण झाल्यावर मेरीने एका छुप्या गटाचे काम करायला सुरुवात केली. झारशाहीविरोधी पत्रके वाचणे, वाटणे आणि आपल्या देशात काय सुधारणा करता येतील याच्या चर्चा करणे असे थोडेसे आदर्शवादी उद्योग हा गट करत असे पण मेरीवर त्याचे खोलवर संस्कार झाले आणि ते जन्मभर टिकले. सामाजिक प्रगती

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

साधायची असेल तर व्यक्ती म्हणून सुधारणा व्हायला हवी, प्रत्येकाने ध्येयपूर्तीसाठी काम करायला हवे आणि मानवतेप्रती आपले कर्तव्य पार पाडायला हवे, अशी मेरीची धारणा होती.

वडिलांना कुटुंबाचा खर्च झेपत नव्हता. त्यामुळे त्यांचे घर आणखी लहान झाले. अठरा वर्षांची मार्था गव्हर्नेसचे काम करू लागली. मोठी बहीण ब्रोन्या डॉक्टरकी शिकायला पॅरिसला गेली होती. तिलाही पैसे पाठवावे लागत, मेरीला पॅरिसला शिकायला जायची इच्छा होती. मेरीने एका शेतकरी कुटुंबामध्ये काम पत्करले. तिथल्या मजुरांच्या मुलांना ती लिहावाचायला शिकवत असे. पाच वर्षे काम केल्यानंतर थोडी पुंजी जमा झाली आणि मेरीने वॉर्सा सोडले आणि ती पॅरिसला आली. त्यावेळी ती चोवीस वर्षांची होती. दिवसभर अभ्यास आणि चहा-पावाचे जेवण ! अभ्यासापुढे त्याही जेवणाची शुद्ध तिला राहत नसे. इच्छाशक्तीच्या जोरावर तिचे शरीर तग धरून होते. जीव ओतून अभ्यास करण्याचं फळ तिला मिळाले. पदार्थविज्ञानशास्त्रात तिने पहिला क्रमांक पटकावला, तर गणितात दुसरा. थोडीशी शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे गरिबीची तीव्रता कमी झाली. तिचे स्वप्न होते शास्त्रज्ञ बनण्याचे; त्यामुळे शिष्यवृत्तीचे पैसे मिळाल्यानंतरही तिच्या राहणीत बदल झाला नाही. अभ्यास मात्र वाढला. त्यात ती परमसुख अनुभवत होती.

मेरीला संशोधनासाठी साधनसामुग्री आणि प्रयोगशाळा यांची गरज होती. एका मित्राने तिची पिएर क्युरीशी ओळख करून दिली. पिएर क्युरी तिच्यापेक्षा आठ वर्षांनी मोठे होते. शास्त्रज्ञ म्हणून त्यांची ख्याती होती. पहिल्या भेटीतच दोघेही शास्त्रज्ञ चर्चेत गढून गेले. दोन वर्षांच्या सहवासाने दोघांनी विवाहबद्ध व्हायचे ठरवले. लग्न नोंदणी पद्धतीने झाले. त्यावेळी मेरी अठ्ठावीस वर्षांची होती. तिला स्वयंपाक करायला येत नव्हता. तिला तशी कधी गरज भासली नव्हती. ती लग्नानंतर स्वयंपाक करायला शिकली. किंबहुना, स्वयंपाकघराचे रूपांतर तिने प्रयोगशाळेत केले होते. त्यांची पहिली मुलगी इरीन 1827 साली जन्मली. दुसरी ईव्ह त्यांनतर सात वर्षांनी! तिचे कौटुंबिक आयुष्य तसे समाधानाचे होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



विल्यम रॉंटजेने 1895 मध्ये एक्स-रे किरण शोधून काढले होते. युरेनियममधून प्रकाशकिरणांचा उत्सर्ग होतो असेही ध्यानात आले होते. क्युरी पती-पत्नीनी याबद्दल संशोधन करायचे ठरवले. पण अडचणी अनंत होत्या. प्रयोगशाळा, साधने नव्हती. शिवाय, मेरी स्त्री. त्यामुळे तिला संशोधन जमणार नाही असे त्यावेळच्या व्यवस्थापनाचे मत होते. मग साधनसामग्रीसाठी जागा आणि पैसे कोण पुरवणार ? जी जागा मिळाली ती उन्हाळ्यात वाळवंटासारखी तर हिवाळ्यात उत्तर ध्रुवासारखी होती, पण दोघांनाही तो अज्ञात प्रकाश सारखा खुणावत होता. प्रयोग सुरू झाले. निरीक्षणातून नवनवीन ज्ञान प्राप्त होत होते. त्यासाठी अथक परिश्रम करण्याची गरज होती. रासायनिक संयुगांच्या बरण्या भरणे, उकळवणे, तासन् तास निरीक्षण करणे हे महिनोन् महिने चालू होते. युरेनियम किंमती असल्यामुळे ते संशोधनासाठी विकत घेण्याची ऐपत नव्हती. कौटुंबिक जबाबदाऱ्या होत्याच.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

क्युरी दांपत्याने 1894 ते 1903 या काळात तीसपेक्षा अधिक शास्त्रीय संशोधन निबंध प्रसिद्ध केले. युरेनियमच्या कचऱ्यातून त्यांना अभिप्रेत असलेला रेडिओॲक्टिव्ह पदार्थ, असाध्य रोगावर रामबाण औषध ठरू शकेल असा त्यांचा कयास होता. या काळात मेरीने पहिला मूलधातू शोधला व त्याला आपल्या देशाचे नाव दिले पोलोनियम. दुसरा शोध रेडियमचा. वर्षानुवर्षे परिश्रम केल्यानंतर मेरीच्या प्रयत्नांचे फळ दिसले ते 1902 मध्ये, एक-दशांश ग्रॅम रेडियमच्या रूपाने. त्यावेळी एक ग्रॅम रेडियमची किंमत दीड लाख डॉलर होती. या महत्त्वपूर्ण संशोधनानंतर पॅरिस युनिव्हर्सिटीने मेरीला पदार्थविज्ञानशास्त्राची डॉक्टरेट बहाल केली आणि 1903 साली मेरी, पिएर व हेन्री बॅक्करेल यांना पदार्थविज्ञानशास्त्राचे नोबेल पारितोषिक विभागून देण्यात आले. मेरीचे स्वप्न एका अर्थाने पूर्ण झाले होते, पण ज्ञानलालसा संपली नव्हती. ती तिच्या अस्तित्वाचा अविभाज्य घटक होती.

सात वर्षांच्या परिश्रमानंतर मिळालेले रेडियम मेरीच्या मालकीचे होते. पण तिने तसे मानले नाही. शास्त्रीय ज्ञान कुणाच्या वैयक्तिक मालकीचे असत नाही असे तिचे मत होते. दोघांनी पेटंट घेतले नाही आणि अत्यंत मोकळेपणाने आपले सारे संशोधन जाहीर केले. जागतिक कीर्ति प्राप्त होऊनही त्यांनी प्रसिद्धीकडे पाठ फिरवून संशोधनकार्यात स्वतःला बुडवून घेतले. तरीही प्रसिद्धी त्यांच्यामागे फिरत राहिली. मानमरातब चालत येऊ लागले. पण पिएरचा 1906 मध्ये अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आणि मेरी एकाकी पडली. तिचे प्रेमनिधान हरपले होते. उरले होते ते फक्त संशोधनकार्य.

पुन्हा एकदा आठ वर्षांनी, म्हणजे 1911 साली मेरीला नोबेल पारितोषिक मिळाले. दोन नोबेल पारितोषिके मिळवणारी ती पहिली स्त्री होय. एकदा एका अमेरिकन पत्रकार महिलेने तिला विचारले, तुला सर्वात अधिक कोणती गोष्ट हवीशी वाटते? मेरीने सांगितले, ''संशोधनासाठी एक ग्रॅम रेडियम हवे आहे. माझ्याजवळ ते विकत घेण्याइतके पैसे नाहीत.'' रेडियम शोधून काढणारीकडे त्यासाठी पैसे नव्हते आणि त्याचे वैषम्यही नव्हते!

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

पुढे, तिच्या मुलीला ईव्हलाही स्वतंत्र संशोधनासाठी नोबेल पारितोषिक मिळाले. एकाच कुटुंबात चार नोबेल पारितोषिके ! असा मान आजवर कुणालाही मिळालेला नाही.

सतत रेडिओॲक्टिव्ह वातावरणात काम केल्यामुळे मेरीची प्रकृती ढासळत होती. अभ्यासाच्या नोट्सही रेडिओॲक्टिव्ह झाल्यामुळे त्या कुणाला उपयोगी पडेनाशा झाल्या होत्या. सतत बारा चौदा तास संशोधनकार्य करून गात्रे खिळखिळी झाली होती. आंधळेपण येईल की काय असे वाटत होते. जगाला कॅन्सरमुक्त करणारे संशोधन करणाऱ्या मेरीची असाध्य रोगातून मुक्तता करू शकेल असे कोणतेही औषध उपलब्ध नव्हते. मेरी 1934 मध्ये आजारी पडली ती त्यातून न उठण्यासाठीच! मेरीचा ज्ञानसाधनेचा मार्ग अतिशय कष्टदायी आणि खडतर खरा, पण त्याचे फळ जगाला अनंत असाध्य व्याधींतून मुक्त करणारे ठरले. त्याच्या आड ना झारशाही येऊ शकली ना पाचवीला पुजलेले दारिद्र्य. त्या अफाट ज्ञानाच्या मालकिणीने मुक्त हस्ताने ते ज्ञान जगाला देऊन टाकले, कोणत्याही फळाची आशा न ठेवता. माणूसच हे करू शकतो.

**शब्दार्थ :** अथक परिश्रम करणे - खूप मेहनत करणे. झपाटणे-एखाद्या गोष्टीचे वेड लागणे. द्वेष्टा - वैर बाळगणारा. धैर्यपूर्ती- उद्दिष्ट पूर्ती. अधाशी- हावरा. कट्टर - कडवा. धारणा असणे - इच्छा असणे. जीव ओतणे - मनःपूर्वक काम करणे. परमसुख अनुभवणे - सर्वोच्च आनंद घेणे. गात्रे - देह, अवयव. वैषम्य - वाईट वाटणे, खेदहोणे. प्रेमनिधान-प्रेमाचा खजिना.

**टिपा : -**

- डॉक्टर आनंदीबाई जोशी - भारतातील पहिल्या महिला डॉक्टर.
- रेडिओॲक्टिव्ह - किरणोत्सर्ग -अस्थायी अणुकेंद्रामधून वेगवेगळे कण उत्सर्जन होण्याची प्रक्रिया

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) युरेनियम मधून कशाचा उत्सर्ग होतो ?
2) मेरी क्युरीचा जन्म कोठे झाला ?
3) मेरीचे मूळ नाव काय होते?
4) क्युरी दांपत्याने 1894 ते 1930 या कालावधीत किती निबंध लिहिले ?
5) एक्स-रे किरणांचा शोध कोणी लावला ?
6) मेरीने शोधलेल्या मूलधातूंची नावे कोणती ?
7) मेरी क्युरीला पहिले नोबेल पारितोषिक केव्हा मिळाले ?
8) एक ग्रॅम रेडियमची किंमत त्याकाळी किती होती ?
9) मेरीचे आई-वडील कोणते काम करत होते ?
10) मेरीच्या मुलांची नावे सांगा ?
11) मेरीने कोणत्या धातूचा शोध लावला व त्याला काय नाव दिले ?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) मेरी छुप्या गटात कोणते काम करीत असे ?
2) प्रयोग करत असताना मेरीला कोणते काम करावे लागे ?
3) स्त्री संशोधनाबद्दल त्याकाळी कोणते विचार होते ?
4) पिएर क्युरीची माहिती द्या ?
5) मेरी क्युरीच्या कुटुंबाबद्दल थोडक्यात माहिती द्या ?

## प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.

1) संशोधन कार्यात मेरीला कोणत्या अडचणी आल्या ?

2) मेरीच्या संशोधन कार्याची माहिती लिहा ?

3) मेरीच्या बालपणाचे चित्रण करा ?

## भाषाभ्यास :

### खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अथक परिश्रम करणे, धारणा असणे, परमसुख अनुभवणे, जीव ओतणे, गात्रे खिळखिळे होणे.

### खालील समासांचा विग्रह करा.

देशोदेशी, इच्छाशक्ती, धैर्यपूर्ती, टिंगलटवाळी.

### अलंकार ओळखा.

मेरी जन्माला आली ती जणू जगाला नवा प्रकाश उपलब्ध करून देण्यासाठी.

## उपक्रम :

1) मेरी क्युरीच्या संशोधनाबद्दल माहिती मिळवून वाचा.

2) ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर आधारित 'अग्निपंख' हे पुस्तक वाचा.

****

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 8. टँकर आला हो अंगणी...

L8E7B9

**परिचय :** **अविनाश ओगले (जन्म – 1957 मृत्यु – 2012)** प्रसिद्ध कवी, लेखक, गजलकार. ‘काजवा’, ‘अंकूर’, ‘बहर’, ‘शब्दगंध’, ‘थेंब टपोरे’ इ. कवितासंग्रह. सह्याद्री वाहिनीवरील ‘शर्यत रे आपुली’, ई टी.व्ही. मराठीवरील ‘हास्यरंग’ या हास्यकवितांच्या कार्यक्रमात सहभाग. जागतिक मराठी परिषद व सह्याद्री वाहिनी आयोजित कविसंमेलनात सहभाग. ‘मिशन चॅम्पियन’ या मराठी चित्रपटासाठी गीतलेखन. काव्यक्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल राणी चन्नमा विद्यापीठाकडून ‘कर्नाटक विद्यापीठ’ विशेष पुरस्कार. ‘गणेश स्मृती पुरस्कार’, ‘विनोदी साहित्य पुरस्कार’, बेळगाव. अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित.

दैनंदिन जीवनात पाण्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. ‘पाणी टंचाई’ निर्माण झाल्यास विविध समस्यांना सामोरे जावे लागते याचे वर्णन या पाठात केले आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**(मूल्य – पाण्याचे महत्त्व)**



'टँकर आला हो अंगणी' हे गाणे म्हणत अंगणात आनंदाने नाचणारी मुले पाहून तुम्हाला कदाचित प्रश्न पडला असेल, 'गंगा आली हो अंगणी' या गाण्याऐवजी ही मुले टँकरचे गाणे का गात आहेत? त्याचं असं झालं.. राज्यात कुठंतरी पूर आणि अतिवृष्टी असली तरी तो अपवाद असतो. पाण्याची टंचाई हे सत्य आहे. वृक्षतोडीमुळे बघता बघता सारी पृथ्वी उजाड झाली. त्यामुळं पाऊस पडायचा थांबला. नदीतलं उरलंसुरलं पाणी गरीब बिचाऱ्या शेतकऱ्यांनी पंपातून ओढून घेऊन आपल्या उसाला घातलं. विहिरी, तळी सारं आटून गेलं. पिण्याच्या पाण्याचीही शाश्वती राहिली नाही. मग सरकारनं युद्धपातळीवर एक योजना हाती घेतली. जिथं म्हणून पाणी सापडेल, तिथून ते टँकरनं जिथं हवं तिथं पोचवायचं. टँकरमुक्त होऊ पहाणारं राज्य क्षणात टँकरयुक्त राज्य झालं. सारीकडं नुसते टँकरच टँकर दिसू लागले. माणसांच्या फक्त दोनच जाती राहिल्या. एक टँकरनं पाणी पुरवणारे आणि दुसरे टँकरचं पाणी पुरवून वापरणारे. यातूनच 'एक गाव एक टँकर,' 'तहान तिथं टँकर,' 'टँकर अडवा, पाणी पळवा,' 'पाण्याची जागा कळवा टँकर फुकट मिळवा' अशा अनेक योजना जन्माला आल्या. पाऊस ही संकल्पनाच नष्ट झाली. टँकर हा शब्द पावसाला समानार्थी वापरला जाऊ लागला. टँकरनं सारं आयुष्य व्यापलं. टँकरशिवाय लोकांना काही सुचेना. रात्री अपरात्री पाणी घेऊन येणारे टँकर डोळ्यातूनही पाणी आणू लागले. नोकरी करणाऱ्या जोडप्यांनी पाणी भरायच्या पाळ्या ठरवून घेतल्या. टँकरला गंगेचं पावित्र्य प्राप्त झालं. म्हणूनच अंगणात टँकर येताच मुलंसुद्धा शब्द बदलून आनंदाने गाऊ लागली. टँकर आला हो अंगणी....

सारीच समीकरणं बदलून गेली. मुलांना पाऊस या शब्दाचा अर्थच कळेना. मग वास्तवाला सामोरं जाण्यासाठी आणि जीवनशैलीशी तादात्म्य राखण्यासाठी शिक्षणखात्यानं सारी पाठ्यपुस्तकं बदलली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

'ये रे ये रे पावसा....' या बाल गाण्याची जागा

'ये रे ये रे टँकर, टाकीत माझ्या पाणी भर, टाकी गेली वाहून, सुख कोणते याहून।' या कवितेनं घेतली. 'देवा तुझे किती सुंदर आकाश' या कवितेऐवजी, 'देवा तुझे किती, सुंदर टँकर, जोडितो मी कर, दोन्ही त्यास ।'

ही कविता समाविष्ट करण्यात आली. 'फुलपाखरु छान किती दिसते' या ऐवजी मुले वर्गात

'जल टँकरू, छान किती दिसतो? या गल्लीतून, त्या बोळातून छान किती पळतो.....'

ही कविता सामुहिक स्वरात गाऊ लागली.

बदलाचं हे वेड इथंच थांबलं नाही. आषाढातला पहिला दिवस कालिदास दिनाऐवजी 'टँकर दिन' म्हणून साजरा केला जाऊ लागला आणि पावसाळी कविसंमेलने 'टँकर कविसंमेलने' या नावाने भरू लागली. असल्या कविसंमेलनातून 'चार चार दिवसातून, एकदाच न्हातो, पाऊस हरवला माझा, मी टँकर गाणे गातो'।

असल्या कविता प्रचंड दाद घेऊ लागल्या. एखाद्या आडगावातून 'आला टँकर माझिया गावात गं, पाणी विकीत, वाढत्या भावात गं' अशी सुखदुःखमिश्रित विराणी पाझरु लागली. गावोगावच्या बहिणाबाई,

'अरे संसार संसार,

जसा पाण्याचा टँकर,

रात सारी रखडावे,

तेंव्हा मिळते घागर'. असली संसारगीते गाऊ लागल्या.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

या गाण्यांनी जीवनाची टँकर शैली खूपच सुसह्य केली. लोक आपले दुःख विसरून टँकरमय झाले. पाऊस, मेघ, नभ, घन, रीमझिम, मृदगंध, मुसळधार वगैरे शब्द हळुहळू जीवनातून पार हद्दपार झाले. शंकराच्या जटेतल्या गंगेपेक्षा टँकरच्या पाईपातून बरसणारी गंगा घरोघरीच्या अंगणात अवतरु लागली, आणि मुले तेच गाणे गात नाचत राहिली, 'टँकर आला हो अंगणी.....

**शब्दार्थ :** अतिवृष्टी - अति पाऊस. उजाड - ओसाड. शाश्वती-कायमस्वरूपी. टंचाई-कमतरता. जोडपे - पती पत्नी. वास्तव - सत्य. तादात्मकता - एकरूपता. दाद घेणे - प्रशंसा करणे. विराणी - विरहिणी, दुःखाचे गाणे. नभ - आकाश. मृदगंध- मातीचा सुगंध. हद्दपार- सीमेपलीकडे. जटा - केसांची निगा न राखल्याने केसांचा बनलेला जुडगा.

**टिपा:-**

1) **कवी कालिदास :** हा प्राचीन संस्कृत कवी होय. 'मेघदूत' हे त्याचे अतिशय गाजलेले काव्य आहे. 'शाकुंतल', 'रघुवंश' याचा कर्ता ही कालिदासच आहे. भारतातील बहुतेक भाषां मध्ये कालिदासाच्या साहित्याचा अनुवाद झाला आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) मुले अंगणात कोणते गाणे गात होती?

2) पृथ्वी उजाड कशामुळे झाली?

3) कशाची शाश्वती राहिली नाही असे लेखक म्हणतो?

4) माणसाच्या कोणत्या दोन जाती उरल्या असे लेखक म्हणतो?

5) पावसाळी कवी संमेलने कोणत्या नावाने भरवली जाऊ लागली?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) 'देवा तुझे किती सुंदर आकाश' या कवितेचे विडंबन ओगले यांनी कसे केले आहे ?

2) अपुऱ्या पाण्याची उणीव भरून काढण्यासाठी कोणत्या योजना अमलात आल्या असे लेखक म्हणतो ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) पाऊस न पडल्यामुळे गावाची अवस्था कशी झाली ?

2) बहिणाबाई चौधरी यांच्या कोणत्या गीताचे विडंबन या कवितेत आहे. लेखकाने ते कसे केले आहे ?

3) जीवनाच्या टँकर शैलीचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

4) लेखकाने चितारलेल्या कवी संमेलनाची माहिती द्या.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भाषभ्यास :**

**खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

आनंद x

अतिवृष्टी x

गरीब x

सुंदर x

सुसह्य x

वास्तव x

**खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

जोडपे –

आयुष्य –

डोळे –

नभ –

देव –

**उपक्रम :**

1) पाण्याचा साठा करण्यासाठी कोणत्या योजना आखाव्यात याचा अभ्यास करा.

2) तुम्हाला आवडलेल्या कोणत्याही दोन गाण्यांचे विडंबन करा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

****

# 9. क्रांतिवीर चापेकर बंधू

AZE1V1

**परिचय :** दत्ता टोळ (दत्तात्रय टोळ उर्फ अमरेंद्र दत्त जन्म 1935) कथा, कादंबरीकार, अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे अनेक वर्षीय कार्यकारी विश्वस्त होते. इसवी सन 2000 साली अहमदनगर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. अंक मोजूया, 'आच्च्या आणि बच्च्या,' 'अमृतपुत्र,' 'स्वामी विवेकानंद' इत्यादी (कथासंग्रह). 'छोटा लाल,' 'जय बांगला,' 'जय मृत्युंजय,' 'जादूची करामत,' 'जादू संपली' (कादंबऱ्या) 'शंखनाद', 'राक्षसाचा डोंगर,' 'शाळा नसलेला गाव,' (एकांकिका) 'एक मन एकरूप' या 'पुस्तकाला' पुरस्कार.

प्रस्तुत पाठ दत्ता टोळ यांच्या 'जय मृत्युंजय' या पुस्तकातील असून यात 'क्रांतिवीर चापेकर बंधू' यांच्या पराक्रमाविषयी सांगितले आहे.

(मूल्य – राष्ट्रभक्ती, राष्ट्रप्रेम)



भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास मोठा रोमहर्षक आहे. त्यातील प्रत्येक पान सुवर्णाक्षरांचे असून देशभक्तांच्या रक्तरंजित कथा त्यावर लिहिलेल्या आहेत. इंग्रजी पाशवी सत्तेला झुगारून देण्यासाठी त्यांच्या राज्यावर सूर्य मावळावयाचा या जिद्दीने भारतवासी प्राणपणाने लढले. भगतसिंग, मदनलाल धिंग्रा, चंद्रशेखर आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस अशा एक ना अनेक शूरांनी, वीरांनी मातृभूमीसाठी प्राण खर्ची घातले. अशाचपैकी क्रांतिवीर चाफेकर बंधूंची कथा आगळी आहे. हरिपंत चाफेकर हे कीर्तनकार होते. त्यांना दामोदर, बाळकृष्ण व वासुदेव हे तीन मुलगे होते. हरिपंत देवळादेवळांतून कीर्तन करीत. कीर्तनांचा विषय जरी धर्म, भगवद्गीता, रामायण, महाभारत असला, तरी प्रचलित राजकारणावर म्हणजे इंग्रजांच्या जुलमी सत्तेवर देशात कीर्तनाद्वारे जागृती करण्याकडे त्यांचा कल होता. कीर्तनासाठी ते आपल्या तीनही मुलांना सोबत घेऊन जात.

हरिपंतांच्या मनात देशजागृतीचे वारे कसे शिरले ? त्यांचा मूळ पिंड होता पैलवानाचा. शक्तीची उपासना करायची, हनुमंताची पूजा करायची, त्याचा देशोद्धारासाठी उपयोग करायचा असा क्रांतिकारक विचार त्यांच्या मनात असायचा पण व्यवसाय पडला हरदासी कीर्तनकाराचा. 'म्हणून बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठऽऽल' असा पांडुरंगाचा जपनाम करीत त्यांची कीर्तने होत. पण आपल्या देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी आपल्याला काही करता येत नाही याची त्यांच्या मनाला रुखरुख लागून राहिली होती.

एकदा कीर्तन संपवून मुलांना बरोबर घेऊन घरी परतल्यावर ओसरीवर ते उदास मुद्रेने बसले. तरुण दामोदरने त्यांना विचारले, ''आज आपण असे खिन्न का? काय सांगू बाळा, ही इंग्रजी सत्ता कधी एकदा या देशातून निघून जाईल याची खंत आहे मनात''.

''तुम्ही तुमच्या परीने प्रयत्न करताच आहात. लोकजागृतीचं केवढं मोठं कार्य तुम्ही अंगीकारलं आहे,'' दामोदर बोलला.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

‘‘पण तेवढ्यानं काय होणार ? काही तरी सक्रिय काम हातून घडावे ही इच्छा आहे,’’ हरीपंत म्हणाले.

‘‘आम्ही पुरी करतो तुमची इच्छा,’’ दामोदर व बाळकृष्ण म्हणाले.

‘‘ती कशी?’’ वडिलांनी विचारले.

‘‘सैन्यात जाऊ. युद्धाचे धडे घेऊ अन् शेवटी आपल्या बांधवांना स्वदेशप्रेमाचे शिक्षण देऊन सशस्त्र क्रांतीचा उठाव करू.’’ दामोदरचे हे बोलणे ऐकून हरिपंतांना आनंद झाला.

‘‘ठीक आहे. तुमच्या हातून तरी हे कार्य घडो.’’ समाधानी मनानं तिघांना आशीर्वाद देऊन हरिपंत उठले.

त्यानंतर दामोदर, बाळकृष्ण व वासुदेवांनी वडिलांना शब्द दिल्याप्रमाणे सैन्यात भरती होण्यासाठी प्रयत्न केला. परंतु त्यांचे दुर्दैव आड आले. त्यांना प्रवेश मिळाला नाही. ते निराश झाले, पण खचले नाहीत. इंग्रजांविरुद्ध कट करण्याचा त्यांनी गुप्तपणे बेत आखला.

इ. स. 1897 साली. पुण्यात प्लेगने हाहाकार उडवला. लोकं घरे सोडून गेली. बाजारपेठा रिकाम्या झाल्या. पुणे ओस पडले. प्लेगचे निवारण करण्यासाठी इंग्रज अधिकारी नेमला. त्या दुष्टाचे नाव रँड. रँडसाहेब या नावाने सर्वजण त्याला ओळखत. अतिशय माजोरी, कमालीचा निघृण, अरेरावीने हुकुमत गाजविणारा अशी त्याची कुप्रसिद्धी होती. हिंदी तरुण इंग्रजांविरुद्ध कट करताहेत हे त्याला पुरेपूर ठाऊक होते. प्लेगचे निर्मूलन करण्याच्या इराद्याने त्याने पुण्यातील घराघरातून झडत्या घेण्यास सुरुवात केली. वेळीअवेळी तो त्याच्या गोऱ्या सोजिरांसह स्वयंपाकघरापासून देवघरापर्यंत हिंडू लागला. सोवळ्याओवळ्याचा त्याच्या गावी पत्ताच नव्हता. पाश्चिमात्य संस्कृतीत वाढलेल्या त्या दुष्टाला स्त्रीपाशी किती मर्यादशील वागावे याचे ज्ञान नव्हते. पण ज्याने वागण्याची मर्यादाच पार ओलांडली, त्याला त्याचे काय ? त्याच्या या छळवणुकीस लोक कंटाळले. सगळे चिडले. तेव्हा चाफेकर बंधूंनी त्याचा खून करण्याचे योजिले.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्या वेळी दामोदर 27 वर्षांचा, बाळकृष्ण 24 तर वासुदेव अवघा 18 वर्षांचा होता. एक अधिकारी मेल्याने इंग्रजी सत्ता उलथून पडत नाही याची त्या तिघा भावंडांना कल्पना होती. परंतु आम्ही भारतमातेचे सुपुत्र शूरवीर, नरवीर आहोत, हे समुद्रापलीकडील इंग्रजी हुकुमतीस त्यांना माहीत करूनद्यायचे होते, म्हणून त्यांनी रँडचा वध करण्याचे निश्चित केले. 22 जून 1897 हा राणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाच्या हीरक महोत्सवाचा दिवस. इंग्रजांच्या दृष्टीने शुभ वाटणारा तो दिवस. यापुढे हा दिवस ते अशुभ मानतील असे कृत्य करण्याची चाफेकर बंधूंनी आखणी केली. त्या रात्री पुण्यातील गणेशखिंडीतील गव्हर्नरच्या बंगल्यात फक्त इंग्रज अधिकाऱ्यांना मेजवानी होती.

दामोदरपंतांनी मारुतीरायास वंदन केले. मनोमन त्याचा आशीर्वाद मागितला. पिस्तुल, गोळ्या इत्यादी आयुधे त्यांनी बरोबर घेतली. गणेशखिंड रस्त्यावर उतारावरील एका अंधाऱ्या जागेत हा सिंहाचा छावा दबा धरून बसला. मध्यरात्री मेजवानी संपली. रँडची काळरात्र सुरू झाली. चाफेकरांचे एक स्नेही भिडे यांनी रँड कुठून, कसा जाणार याची बातमी चाफेकरांना दिली. रँडची गाडी बंगल्याच्या आवाराबाहेर पडली. मृत्यूच्या मार्गावर रँड निघाला. शिकार नजरेत येताच दामोदरपंत सज्ज झाले. बंगल्याबाहेर दीडहजार फुटांवर रँडची गाडी येताच बंदुकीचा आवाज झाला. ठो ठो ठो सुंऽऽ दामोदरपंतांच्या बंदुकीतून गोळ्या बाहेर पडल्या. त्यांनी कामगिरी यशस्वीपणे बजावली. रँडच्या पाठीचा कणा हे त्यांचं लक्ष्य होतं. तेवढ्यात मागील गाडीतून आयर्स्ट नावाचा दुसरा अधिकारी चालला होता तो ओरडला. चाफेकरांनी त्याच्या डोक्यावर गोळ्या झाडल्या, तो जागच्याजागी ठार झाला. रँड मात्र पुढे 11 दिवस मरणाच्या यमयातना भोगत दवाखान्यात होता. दुसऱ्याला छळणाऱ्याला योग्य ते शासन मिळाले. हा पराक्रम चाफेकर बंधूंचा !

**शब्दार्थ :** रोमहर्षक –उल्हास, आनंददायी, रोमांचित करणारा. रक्तरंजित – रक्ताने माखलेला. पाशवी – पशूप्रमाणे, क्रूर. झुगारून देणे – प्रभुत्व मान्य न करणे, झिडकारून टाकणे. प्राणपणाने लढणे – जीवाची पर्वा न करता लढणे. राज्यावर सूर्य मावळणे – स्वराज्य गमावणे, अधिकार संपणे. उपासना – प्रार्थना, भक्ती. मुक्त – स्वतंत्र. रूख रुख लागणे – मनाला चुटपुट लागणे, हूरहूर लागणे. मुद्रेने – चेहऱ्याने.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

कार्य अंगिकारणे - कामहाती घेणे. सशस्त्र क्रांती - हाती शस्त्र घेऊन केलेली क्रांती, युद्ध. दुर्दैव आड येणे - नशिबाची साथ न लाभणे. माजोर - उर्मट. निर्घृण - निष्ठूर. सोजिर - सैनिक.

**टिपा :**

1) रँड - 1887 साली पुण्यातील प्लेग या संसर्गजन्य रोगाच्यावेळी चीफ कमिशनर असणारे इंग्रज अधिकारी, ते अतिशय क्रूर होते. प्लेगची साथ आटोक्यात न आणता लोकांच्यावर अत्याचार केले. वरील पाठात त्यांच्या खूनाची कथा आली आहे.

2) प्लेग - प्लेग हा एक संसर्गजन्य रोग आहे. हा रोग 'येर्सिनिया पेस्टिस' या जिवाणूमुळे होतो. प्लेग हा रोग उंदरांच्यामुळे माणसांमध्ये होतो. शरीरावर गाठी उठणे, भयंकर ताप येणे, अतिसार होउन रोगी दगावणे असे या रोगाचे स्वरूप होते. या रोगाने त्या काळात हजारो निरपराधी लोक मृत्युमुखी पडले. लाखो लोक घरदार सोडून गेले. अलीकडच्या काळातील 'कोविड' या रोगाप्रमाणे हा भयंकर रोग होता.

3) हीरक महोत्सव - साठावा वर्धापन दिन. याला हीरक जयंती किंवा साठावी जयंती असे सुद्धा म्हणतात.

4) क्रांती - प्रस्थापित अन्यायी राज्यव्यवस्था उलथवून टाकण्यासाठी लोकांनी केलेले राष्ट्रहिताचे युद्ध.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) चाफेकर बंधूंच्या वडिलांचे नाव काय होते?

2) हरिपंत चाफेकरना किती मुले होती?

3) चाफेकर बंधूंची नावे सांगा.

4) हरिपंतांचा मूळ पिंड कोणाचा होता?

5) हरिपंताच्या मनात कोणती खंत होती?

6) सैन्यात भरती होण्याचा प्रयत्न कोणी केला?

7) प्लेग निवारण्यासाठी इंग्रजांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे नाव काय होते?

8) रँडच्या मागील गाडीतून जाणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव काय होते?

9) रँड किती काळ मरण यातना सोसत होता?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) हरिपंत चाफेकर कोण कोणत्या विषयावर कीर्तन करीत ?

2) हरिपंतांच्या मनात देश जागृतीचे वारे कसे शिरले ?

3) हरिपंतांची 'सक्रिय काम हातून घडावे' ही इच्छा दामोदर कशी पूर्ण करणार होते ?

4) सैन्यात भरती होता आले नाही तेव्हा चाफेकर बंधूंनी देश सेवेचा कोणता मार्ग अवलंबिला ?

5) पुण्यातील प्लेगाचे चित्रण लेखकाने कसे केले आहे ?

6) 22 जून 1897 टीप लिहा.

7) रँड कुठून आणि कसा येणार होता ? याची माहिती दामोदर पंताना कोणी दिली ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) हरिपंतांची व्यक्तिरेखा रेखाटा.

2) उदास झालेले हरिपंत आणि दामोदर यांच्यात कोणता संवाद झाला ?

3) रँडचा निर्दयपणा लेखकाने कसा वर्णन केला आहे.

4) रँडने लोकांचा छळ कसा केला ?

5) रँडचा वध करण्यापूर्वी दामोदर पंतांनी कोणती तयारी केली ?

6) दामोदरपंतांनी रँडचा वध कसा केला ?

7) चाफेकर बंधूंच्या पराक्रमाचे वर्णन करा.

## भाषाभ्यास :

**खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.**

झुगारून देणे, प्राणपणाने लढणे, दुर्दैव आड येणे, राज्यावर सूर्य मावळणे, रूख रुख लागणे,

## उपक्रम :

1) ‘माझा आवडता क्रांतिकारक’ या विषयावर दहा ते पंधरा ओळी निबंध लिहा.

2) खालील क्रांतिकारकांची चरित्रे मिळवून वाचा.



झाशीची राणी लक्ष्मी बाई



चंद्रशेखर आझाद



राजगुरू



भगत सिंग



तात्या टोपे



झलकारी बाई

© NOT TO BE PUBLISHED

# 10. सत्य : श्रेष्ठतम तत्त्व

T2A3U5

**परिचय:** **विनायक नरहर भावे (जन्म 1895 – मृत्यू 1982)** आचार्य विनोबा भावे या नावाने लोकप्रिय, हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक व भूदान चळवळीचे प्रणेते होते. महात्मा गांधींनी 1940 मध्ये 'वैयक्तिक सत्याग्रह' पुकारला, त्यावेळी पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी भावेंची निवड केली. ब्रिटिश राजविरोधी या आंदोलनाचे पर्यवसन 1942 मध्ये 'छोडो भारत' आंदोलनात झाले. भावे पुढे सर्वोदयी नेते म्हणून प्रसिद्ध झाले. 'भारतरत्न' 'पुरस्काराने सन्मानित' केले. त्यांनी अष्टादशी, ईशावास्यवृत्ति, उपनिषदांचा अभ्यास, गीताई-चिंतनिका, गीता प्रवचने, गुरूबोध सार, जीवनदृष्टी, भागवत धर्म-सार, मधुकर इ. पुस्तकाचे लेखन केले.

प्रस्तुत वैचारिक लेख 'आध्यात्म तत्व सुधा' या पुस्तकातून घेतला आहे. सत्य ही गोष्ट सर्वश्रेष्ठ आहे याची मांडणी या लेखातून केली आहे.

@MSBTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – वैचारिक लेख)



कधी कधी सत्याची व्याख्या विचारली जाते. पण ती विचारणेच चुकीचे आहे. एकदा एका जणाने विचारले, ''सत्य म्हणजे काय?'' मी म्हटले, ''सत्य म्हणजे खजूर!'' त्याला वाटले, मी विनोद करीत आहे. मी मग म्हणालो, ''सत्य खजूर नाही असे वाटत असेल तर सत्य बदाम आहे असे समजा.'' पण त्याला हे ही पटले नाही. तेव्हा मी म्हटले, ''सत्य काय वस्तू आहे हे तुम्हाला ठाऊकच आहे असे दिसते. कारण मी ज्या गोष्टीचे नाव घेतो ती गोष्ट तुम्हाला पटत नाही. मग तुम्हीच सांगा सत्य काय आहे ते? त्यानुसारच मग मी व्याख्या करेन. सत्याची व्याख्या ही सत्याच्या कसोटीवरच पारखली जाईल.''

खरे म्हणजे, सत्याची व्याख्या होऊच शकत नाही. सत्य स्वतः स्पष्टच असते. एवढे स्पष्ट तत्त्व जगात दुसरे नाही. हिंसेची व्याख्या करायला गेलो तर जड जाईल. पण सत्याबाबत मात्र असे नाही. 'सत्य म्हणजे जे खरे आहे'. संस्कृतमध्ये सत्याचा अर्थ 'नैतिक सत्य' (मॉरल ट्रूथ) असा करतात. कोणत्याही गोष्टीची व्याख्या करायची असेल तर सत्याच्या आधारानेच करता येईल. अमुक मनुष्य सत्यवादी आहे असे म्हणतात तेव्हा सत्याची नैतिक दृष्टीने व्याख्या करण्यात येत असते. मात्र परम सत्याची (सुप्रीम ट्रुथ) व्याख्या करता येत नाही.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

अंतरात्म्याला ज्याद्वारे आपण ओळखतो आणि ज्यामुळे अंतरात्म्याचे समाधान होते, तेच सत्य. अंतरात्म्याचे समाधान होत नसेल किंवा त्याला धक्का लागत असेल, तर तेथे असत्य आहे. अर्थात् अंतरात्माच सत्य-असत्याचा साक्षी आहे.

अनुभुति वेगवेगळ्या असू शकतात. एखादा दरोडेखोर म्हणू शकतो की ''मी हे काम माझ्या मुलाबाळांसाठी कर्तव्यभावनेने केले.'' पण हे बरोबर नाही. कारण सत्यात समत्व असते. हे दुसरे लक्षण आहे. सत्यात संतुलन (बॅलन्स) असते, त्यात मनाचे पारडे एकीकडे झुकत नाही. सत्यात समदर्शन असते, समाधान असते, तुमच्या अंतःकरणातून आवाज येतो, त्यानुसार तुम्ही चाललात तर सत्य-मार्गाने चाललात असे होईल. मग तुम्हाला गंगास्नान करण्याची, तीर्थाटन करण्याची गरज नाही. न्याय-निवाडा करताना न्यायाधीश सत्याला धरून राहण्याचा प्रयत्न करतो. समत्वयुक्त निर्णय जेथे होतो तेथे सत्य असते. सत्यासाठी समत्व आवश्यक आहे.

## जीवनाचा सत्याशी संबंध

जीवनाचा सत्याशी काय संबंध आहे?

'सत्यशोधनम्.' हे जीवनाचे स्वरूप आहे.

गांधीजींनी, 'एक्सप्रिमेंट्स वुइथ ट्रूथ (सत्याचे प्रयोग)' असा शब्दप्रयोग केला. 'प्रयोगा' या ऐवजी 'सत्याचा शोध' असा शब्दप्रयोग मला भावतो. 'प्रयोग' हा विज्ञानाचा शब्द आहे. सत्याचा एकेक अंश ध्यानात येत जातो. पूर्ण सत्याचे एकदम आकलन होत नाही.

सत्याची प्राप्ती कशी होईल हा प्रश्न आहे. गांधीजींनी सांगितले होते की अहिंसेने सत्य प्राप्त होऊ शकते. मला वाटते, सत्य, नम्रता, तटस्थता आणि अनाग्रहाने प्राप्त होते. विज्ञानातही अनाग्रह असतो. प्रयोगातून जे सिद्ध होईल, तेच खरे मानले जाते.

## सत्य : मौलिक गुण

सत्य एक मूलभूत, मौलिक गुण आहे. सत्य सर्वश्रेष्ठ नीतिधर्म आहे. एका बाजूला सगळे नीतिशास्त्र आणि दुसऱ्या बाजूला केवळ सत्य असेल तरी सत्याचेच पारडे जड दिसेल. म्हणून अन्य नीति-धर्म सत्याच्या तुलनेत गौण आहेत. आत्म-प्राप्तीसाठी सत्य अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. सत्याचा अर्थ केवळ वाणीचे सत्य नाही, तर मनसा-वाचा-कर्मणा सत्य. मनुष्य-जीवन सत्याच्या आधाराने उभे राहील तेव्हाच आत्म्याचे दर्शन होईल. परमेश्वराकडे पोहचणारा मार्ग सत्याचाच बनलेला आहे.

सत्य एक मूलभूत गोष्ट आहे. महापुरुषांमध्ये अनेक दोष असतात. ऋषि अत्यंत संतापी होते असे आपण ऐकतो. मात्र असत्याचरणी व्यक्ति सत्पुरुष असूच शकत नाही. प्राचीन काळापासून आतापर्यंत सत्याला महत्त्व दिले गेले आहे. ती प्राथमिक महत्त्वाची गोष्ट मानली गेली आहे.

सत्य फक्त मुले व संन्यासी यांच्यापुरते मर्यादित ठेवले आहे. बाकी सगळे या नियमाला अपवाद ! अपवाद इतके जास्त करण्यात झाले आहेत की संस्कृत

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

व्याकरणात जशी नियमाहून आपवादांची यादी लांब बनते त्याची आठवण यावी. राजकारण, व्यापार, कोर्ट आणि लग्नातही खोटेपणा चालतो. त्याला खोटेपणा म्हणूच नये असा तर्क दिला जातो. म्हणजे हे लोक असत्याची व्याख्याच बदलू इच्छितात.

## मुख्य दोष असत्य

वास्तविक सत्य हा मौलिक (एलिमेन्टरी) गुण मानणे पुरेसे नाही. नीतिशास्त्रात जर हा विचार रूढ झाला की सत्यच एकमात्र नैतिक तत्त्व आहे, बाकी सगळी नैतिक तत्त्वे (गुण) नाहीतच, केवळ सामान्य गुण किवा दोष आहेत, तर समाजात लवकर सुधारणा होईल आणि आध्यात्मिक साधनेत मदत मिळेल. मनुष्य शिक्षेच्या भीतीने सत्य लपवतो. याला चातुर्य समजले जाते! चोरी, दारू व खून ही महापातके मानली जातात, बाकी गौण पातके मानली जातात. पण जगात मुख्य दोष 'असत्य' हाच आहे, बाकी सगळे दोष गौण आहेत असे जोपर्यंत आपण मानणार नाही, तोपर्यंत साधनेत प्रगति होणार नाही असे मला वाटते.

## पाप : मानसिक रोग

एखादा माणूस आजारी पडला तर तो ते लपवून ठेवीत नाही. लपवून ठेवले नाही तरच रोग कळतो. मग त्या रोग्याला कडू औषध दिले जाते किंवा कधी-कधी ऑपरेशनही करण्यात येते. रोग्याला आपण शिक्षा करीत नाही, तर त्याच्यावर उपचार करतो; त्याची सेवा करतो. त्यामुळे त्याचा रोग बरा होतो. परंतु एखाद्याने जगात निंदा होईल असे वाईट कृत्य केले असेल तर तो ते लपवतो. अशा तऱ्हेने मानसिक दोष लपवत राहिले तर ते दूर करण्याचा मार्गच बंद होतो. आपण रोग्याचा तिरस्कार करीत नाही, उलट त्याच्याकडे दयेने पाहतो. इस्पितळात गंभीर रोग झालेल्यांकडे सगळे घृणेने नव्हे, तर दयेच्या भावनेने पाहतात. मानसिक दोषांकडेही जर घृणेच्या भावनेने पाहण्याऐवजी दयेच्या भावनेने पाहिले तर समाजात लवकर सुधारणा होईल. समाजात दोषांबद्दल तिरस्कार नसला तरच ते कमी होतील.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

म्हणून सर्वांनी, विशेषतः आध्यात्मिक साधना करणाऱ्यानी सत्य कधीच लपवू नये असे माझे मत आहे. माझ्या दृष्टीने सर्वात श्रेष्ठ सद्गुण सत्य आहे. हे खरे असेल वा नसेल, पण सर्व दुर्गुणांमध्ये सर्वात वाईट दुर्गुण तर असत्य हाच आहे असे माझे ठाम मत आहे. सत्य हीच सर्वोत्तम साधना आहे, तीच प्राथमिक, मधली आणि अंतिम साधना आहे.

**शब्दार्थ :** पारखणे – ओळखणे, ठरवणे. अंतरात्मा – आपला आतला आवाज, आपला आत्मा. मन– जिवात्मा. अनुभूती–अनुभव. समत्व –सारखेपणा, संतुलन, समतोलपणा. तीर्थाटन – तीर्थयात्रा. मौलिक – मूल्यवान, नैतिक – नीती प्रधान. घृणा – निंदा, राग. घृणा करणे– निर्भत्सना करणे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

### प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

1) सत्य म्हणजे काय ? या प्रश्नाला विनोबांनी कोणते उत्तर दिले?
2) कोणते अत्यंत स्पष्ट तत्व आहे असे विनोबा म्हणतात?
3) संस्कृतमध्ये सत्याचा अर्थ काय आहे?
4) कोणत्या सत्याची व्याख्या करता येत नाही?
5) सत्य असल्यास साक्षी कोण आहे?
6) जीवनाचे स्वरूप कोणते? गांधीच्या सत्याच्या प्रयोगाऐवजी कोणता शब्द विनोबांना भावतो?
7) कशाने सत्य प्राप्त होऊ शकते असे गांधीजी म्हणतात?

## प्रश्न 2. खालील रिकाम्या जागा भरा.

1) सत्य एक _____ गुण आहे

2) मुख्यदोष _____ आहे

3) माणूस _____ लपवतो ?

4) प्राथमिकचा एक अर्थ _____

## प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन ओळीत लिहा.

1) सत्याचे प्रयोग हा शब्द विनोबांना का पटलेला नाही ?

2) सत्य कशाने प्राप्त होते असे विनोबा म्हणतात ?

3) रोगाशी आपण कसे वागतो ?

4) मानसिक रोग लपवल्याने काय होते ?

5) रोगी आजारी पडला तर काय केले जाते ?

6) शिक्षा का आवश्यक आहे असे लोकाना वाटते ?

7) मानसिक दोषाकडे कशा भावनेने पाहावे ? का ?

8) अंतरात्म्याचे वर्णन लेखकाने कसे केले आहे ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.

1) सत्याचे कोणते गुण लेखकाने वर्णिले आहेत ?

2) सत्य सर्वश्रेष्ठ नीती धर्म आहे हे लेखकाला कसे पटवून दिले आहे ?

3) सत्य मौलिक गुण आहे हे लेखकाने कसे वर्णविले आहे ?

4) समाजात सुधारणा कधी होईल ?

5) पाप मानसिक रोग आहे याचे स्पष्टीकरण लेखकाने कसे केले आहे ?

## भाषाभ्यास :

### खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.

| वाकप्रचार | अर्थ | वाक्यात उपयोग करा. |
|---|---|---|
| 1) पारडे जड होणे | | |
| 2) तीर्थाटन करणे | | |
| 3) घृणा करणे | | |

## उपक्रम :

1) तुमच्या परिसरातील कोणत्याही एका समाज सुधारकांची मुलाखत घ्या.

2) विनोबांच्या 'भूदान' चळवळीची माहिती मिळवा.

@MTBS
NOT TO BE REPUBLISHED

****

# 6. या काळाच्या भाळावरती

Q2C8I8

**परिचय :** **उत्तम कोळगावकर (जन्म – 1949)** हे ग्रामीण परिसराशी निगडित अशा अनुभवातून व प्रतिभासृष्टीतून चिंतनशील कविता रचणारे कवी होत. अनेक मासिकातून त्यांनी काव्यलेखन केले आहे. 'जंगलझडी', 'तळपाणी' हे त्यांचे काव्यसंग्रह आणि 'छप्पा पाणी' हा बालकवितांचा संग्रह प्रसिद्ध आहे.

कोणतीही गोष्ट साध्य करायची असेल तर आपण श्रमाची तयारी ठेवावी. येणाऱ्या अडचणींना; समस्यांना न घाबरता सामोरे गेलो तर अशक्य असे काहीच नसते. हे या कवितेतून कवीने स्पष्ट केले आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**(मूल्य – उज्वल भवितव्याची आस)**



या काळाच्या भाळावरती; तेजाचा तू लाव टिळा
आणि फुलू दे तुझ्या श्रमातून मानवतेचा इथे मळा !!धृ!!

नित्य नवी तू पाही स्वप्ने
साकाराया यत्न करी
सूर्यफुलांच्या फुलवी बागा
उजेड यावा घरोघरी
वाहत येवो समृद्धीच्या
नद्याच सगळ्या खळा खळा !!1!!

काट्यांमधल्या वाटांमधुनि
चालत जा तू पुढे पुढे
या वाटा मग अलगद नेतील
पाऊस भरल्या नभाकडे
झळा उन्हाच्या सरून जातील;
नाचत येईल पाण कळा !!2!!

अंधाराला तुडवित जाऊन
घेऊन ये तू नवी पहाट
कणाकणाला उजेड देऊन
उजळ धरेचे दिव्य ललाट
डोंगर सागर पत्थर यांना;
सुवर्ण सुंदर देई कळा !!3!!

उंच आभाळी घेऊन झेपा
काढ शोधुनि नव्या दिशा
नवीन वारे घेऊन ये तू
घेऊन ये तू नव्या उषा
करणीमधुनी तुझ्या गाऊ दे;
धरणीवरल्या शिळा शिळा !!4!!

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**शब्दार्थ :** भाळ – कपाळ. श्रम – कष्ट. यत्न – प्रयत्न. समृद्धी – भरभराट. नित्य – नेहमी. अलगद – हळुवार. धरा – वसुंधरा, पृथ्वी. ललाट – कपाळ. पत्थर – दगड, पाषाण. सुवर्ण – सोनं. सोनेरी उषा – पहाट. शिळा – दगड. करणी – कर्तृत्व.

## कवितेचा सरळ अर्थ (भावार्थ) :

या कवितेत उत्तम कोळगावकरांनी मानवतेचा संदेश दिला आहे. माणसाने आपल्या कर्तृत्वाने वर्तमानावर आपली छाप सोडावी, असे सांगितले आहे. ते म्हणतात, माणसाने वर्तमान अधिक सकस सुंदर आणि समृद्ध करावा. वर्तमानकाळाच्या कपाळावर जर तेजाचा दिवा लावला तर वर्तमान सुंदर होईल आणि त्यासाठी आपले श्रम महत्त्वाचे आहेत. नवनवीन स्वप्ने माणसाने पहावीत. ती साकारण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करावेत. तरच सूर्यफुलाच्या बागा फुलतील. घरोघरी त्याचा उजेड पसरेल व समृद्धी येईल, आयुष्यात सुखदुःखाचे क्षण येतात. ही वाट सरळ नसते. तर काट्याकुट्यांनी भरलेली असते. पण त्याची तमा न बाळगता माणूस पुढे जात राहिला तर दुःखाच्या झळा नाहीशा होऊन या काट्याकुट्यांच्या वाटाच तुम्हाला पाऊस भरल्या नभाकडे घेऊन जातील आणि जीवनात ओलावा निर्माण होईल. अंधार तुडवीत जाऊन मानवाने नवी पहाट आणावी आणि कणाकणात उजेड देऊन या पृथ्वीला सौभाग्यशाली बनवावे. जीवनाला सौंदर्य द्यावे. सतत नव्या दिशा शोधून काढून नवीन विचार क्रांतिकारक घटना यांचा शोध घ्यावा. आपल्या कर्तृत्त्वावर आणि काळावर आपली नाम मुद्रा उमटवावी. धरणीवरल्या शिळांमधून संगीत निर्माण करावे अशी अपेक्षा येथे कवी व्यक्त करतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) काळाच्या भाळावर कशाचा टिळा लावण्यास कवी सांगत आहे ?

2) श्रमातून कशाचा मळा फुलू दे असे कवी म्हणतो ?

3) काय साकारण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे कवी म्हणतो ?

4) सूर्यफुलांच्या बागा फुलविल्याने काय होईल ?

5) उंच आभाळी झेप घेऊन कवी काय शोधण्यास सांगतो ?

6) धरणीवरल्या शिळा कशामुळे गाऊ देत ?

7) नवी पहाट आल्यावर कोणाकोणाला सुवर्णकळा येईल ?

8) माणसाने कशासाठी प्रयत्न करावा ?

9) डोंगर, सागर, पत्थर यांना कोण सुवर्णकळा देईल ?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) पाऊस भरल्या नभाकडे कशातून जावे लागते ? त्या वाटा कशा नेतील ?

2) धरेचे ललाट केव्हा उजळेल असे कवी म्हणतो ?

3) कवीला आकर्षित करणाऱ्या दोन नव्या गोष्टी सांगा ?

4) उंच आभाळी झेप घेऊन कवी काय करण्यास सांगत आहे ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) नवी पहाट काय करेल असे कवी म्हणतो ?

2) नवी स्वप्ने साकारण्याचा प्रयत्न केल्यास काय होईल ?

3) पाणकळा नाचत केव्हा येईल असे कवीला वाटते?

NOT TO BE REPUBLISHED @MTBS

**प्रश्न 4. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) अंधार तुडवित जाऊन काय काय करावे असे कवी म्हणतो ?
2) या कवितेतून कवीची उज्वल भवितव्याची आस कशी स्पष्ट होते ?
3) मानवतेचा मळा फुलवण्यासाठी कोण कोणते प्रयत्न केले पाहिजेत असे कवी म्हणतो ?
4) मानवाने आपल्या कर्तृत्वाने काय काय करावे असे कवी म्हणतो ?

**प्रश्न 5. खालील ओळींचा आशय स्पष्ट करा.**

1) या वाटा मग अलगद नेतील, पाऊस भरल्या नभाकडे
झळा उन्हाच्या सरून जातील, नाचत येईल पाणकळा

**भाषाभ्यास :**

**खालील ओळी वाचून अलंकार ओळखा.**

अंधाराला तुडवित जाऊन, घेऊन ये तू नवी पहाट
कणाकणाला उजेड देऊन, उजळ धरेचे दिव्य ललाट

**खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

भाळ, साकारणे, समृद्धी, नभ, अलगद, पत्थर, उषा, सुवर्ण, दिव्य,

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उपक्रम :**

1) मानवतेचे कार्य केलेल्या एका व्यक्तीच्या कार्याची माहिती आठ-दहा वाक्यात लिहा.
2) केशवसुतांची 'नवा शिपाई' व 'तुतारी' या कविता मिळवून वाचा.

# अलंकार

आता आपण अर्थालंकारातील 'उपमा' व 'उत्प्रेक्षा' या अलंकारांचा अभ्यास करू. **अर्थालंकारात खालील गोष्टी नीट अभ्यासा.**

उदा : हा आंबा साखरेसारखा गोड आहे.

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म |
|---|---|---|---|
| आंबा | साखर | सारखा | गोड |

**खालील संकल्पना लक्षात ठेवा.**

(अ) ज्या वस्तूला उपमा दिलेली असते तिला उपमेय म्हणतात.

(आ) ज्या वस्तूची उपमा दिलेली असते तिला उपमान म्हणतात.

(इ) दोन वस्तूंत असणारा सारखेपणा याला समान धर्म म्हणतात.

(ई) सारखेपणा दाखवण्यासाठी वापरला जाणारा शब्द त्याला साम्यवाचक शब्द म्हणतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## (1) उपमा अलंकार

**खालील उदाहरण वाचा, समजून घ्या व कृती सोडवा.**

सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरी ।

(अ) प्रस्तुत वाक्यातील उपमेय-

(आ) प्रस्तुत वाक्यातील उपमान-

(इ) प्रस्तुत वाक्यातील समान धर्म-

(ई) प्रस्तुत वाक्यातील साम्यवाचक शब्द-

## उपमा अलंकाराची वैशिष्ट्ये

- उपमेय व उपमान यांच्यात साम्य असते.
- हे साम्य दाखवण्यासाठी सम, समान, सारखा/खे प्रमाणे, परी, गत इत्यादी साम्यवाचक शब्द वापरले जातात.

दोन वस्तूंतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने वर्णन केलेले असते, तिथे '**उपमा**' अलंकार होतो.

## (2) उत्प्रेक्षा अलंकार

**खालील उदाहरण वाचा, समजून घ्या व कृती सोडवा.**

हा आंबा म्हणजे जणू साखरच

(अ) प्रस्तुत वाक्यातील उपमेय – ☐

(आ) प्रस्तुत वाक्यातील उपमान – ☐

(इ) प्रस्तुत वाक्यातील समान धर्म – ☐

(ई) प्रस्तुत वाक्यातील साम्यवाचक शब्द – ☐

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## उत्प्रेक्षा अलंकाराची वैशिष्ट्ये

- उपमेय हे जणू उपमानच असते.
- या अलंकारात जणू काय, जेवि, गमे, भासे वाटे, की, हे शब्द येतात.

उपमेय हे जणू उपमानच आहे असे जिथे वर्णिलेले असते, तिथे 'उत्प्रेक्षा' अलंकार होतो.

## खालील वाक्ये वाचा व तक्ता पूर्ण करा.

| वाक्य | उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द |
|---|---|---|---|
| (अ) आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच. | | | |
| (आ) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे. | | | |
| (इ) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे. | | | |
| (ई) ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू. | | | |

****

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

# 7. बाप म्हणायचा

A6U2P1

**परिचय :** **इंद्रजीत भालेराव** (1962) मराठीतील प्रसिद्ध ग्रामीण कवी होत. दूर राहिला गाव, जातं गाणं गातं, हे त्यांचे कविता संग्रह. आम्ही काबाडाचे धनी, 'कोळंबीची कहाणी' या त्यांच्या दीर्घ कविता. रान मळ्याची वाट, 'गावाकडे चल माझ्या दोस्ता' हे बालकविता संग्रह. याशिवाय त्यांचे गद्य लेखन ही प्रसिद्ध आहे. ग्रामीण दु:खाची नेमकी नाळ त्यांच्या कवितेला सापडली आहे. निसर्गाशी त्यांच्या कवितेचे एक छान नातं आहे.

लोकवाङ्मयाचा उपजत रेखीवपणा, मायबोलीचा थेट जिव्हाळा, माणसाच्या जगण्यातल्या वेदनेची खोल जाणीव, त्यांच्या कवितेत आढळून येते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – भूतदया)



बाप म्हणायचा काढलेली नखं
दारात कधीच नयेत टाकू,
दाणे समजून खातात चिमण्या
आणि मरतात आतडे फाटू फाटू,
सुगी संपल्यावर बाप,
मंदिरात नेऊन कणसं बांधायचा.

वावरातून उडविलेल्या चिमण्यासाठी,
पाण्याचं मडकं बांधून पुण्य सांधायचा.

पाखरू असूनही ओळखायच्या,
बापाच्या मनीचा भाव,
सुगी संपली तरी चिमण्या
सोडीत नसायच्या गाव.

बाप म्हणायचा, भाद्रपदात
ऊन इतकं तापतं,
की बैलाच्याही पाठीवरचं,
कातडं थरथर कापतं.

नांगर उभा करून
गडी पाणी प्यायला गेला,
की समजा बैलांनी,
नांगर ओढून सावलीला नेला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

भाद्रपदातल्या उन्हाला,
इतकी असते आग.
की पोलादी काळजाचाही,
उलायला लागतो साग.

**शब्दार्थ :** फाटू – फाटून. सुगी – पीक काढणीचा हंगाम. मंदिर – देऊळ. वावर – शेत. सांधणे – जोडणे. मनीचा भाव – मनातील भावना हेतू.

## कवितेचा सरळ अर्थ (भावार्थ)

कवीचा बाप कवीला सांगायचा, की काढलेली नखे दारात टाकू नयेत. चिमण्या दाणे समजून ती नखे खातात व आतडी फाटून मरून जातात. बाप कोमल मनाचा आहे. त्याला पशु – पक्षांविषयी अत्यंत जिव्हाळा, प्रेम आहे. पक्षी नखे अन्न म्हणून खातील, त्यांच्या शरीरातील कोमल आतडी फाटून ती मरून जातील या करिता, कवीचा बाप दारात नखे टाकू नका असे सांगतो. येथे त्याच्या कोमल मनाची, पक्षी प्रेमाची अनुभूती येते. पीक काढणी झाल्यानंतर सुगीचा काळ संपायचा व पक्षांना अन्नाचा प्रश्न निर्माण होईल या भीतीने कवीचा बाप मंदिरात कणसं बांधायचा. शेताशिवारातून, वावरातून उडालेल्या चिमण्यांना पिण्यासाठी पाणी मिळावे यासाठी पाण्याने भरलेली मडकी बांधून त्यांची तहान भागविण्यासाठी बाप धडपडत असायचा. या कार्यातून कवीचा बाप पुण्य सांधायचा. पाखराच्याविषयी बापाच्या मनातील भावना, कळवळा, प्रेम, माणुसकी, भूतदया यातून दिसून येते.

कवीचा बाप म्हणत असे की; भाद्रपद महिन्यात ऊन खूप तापतं. तो होणारा उन्हाचा दाह बैलांना सहन होत नाही. त्यांचे कातडे थरथरत असते. उन्हाला प्रतिकार

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

करण्याचा प्रयत्न करते. नांगर थांबून जर (गडी) शेतकरी पाणी प्यायला गेला तर बैल नांगर ओढत सावलीच्या ठिकाणी नेतात. एवढी भाद्रपदाच्या उन्हात आग असते, इतका दाह असतो. कितीही कणखर मनुष्य असला तरी त्याला सुद्धा त्या मुक्या प्राण्याबद्दलची आपली वागणूक अपराधयुक्त वाटते. त्या उन्हाच्या दाहामुळे मुक्या प्राण्यांनाही सावलीची ओढ लागते.

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) कवीचा बाप कवीला काय म्हणायचा ?

2) दारात कधीच नखं का टाकू नयेत ?

3) सुगी संपल्यावर कवीचा बाप मंदिरात कणसं का बांधायचा ?

4) चिमण्यांच्या पाण्याची व्यवस्था कशी केली जाई ?

5) सुगी संपली तरी चिमण्या गाव का सोडत नसत ?

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) दारात नखे टाकल्याने काय होते?

2) बाप पुण्य कसे सांधायचा (संपादन करायचा)?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे चार ते पाच वाक्यात लिहा.**

1) 'बाप म्हणायचा' या कवितेचा आशय तुमच्या शब्दात लिहा.

2) बाप ही व्यक्तीरेखा कवीने कशी चित्रित केली आहे ?

3) भाद्रपदातील उन्हात बैलांची व माणसांची अवस्था कशी असते ?

**भाषाभ्यास :**

**समानार्थी शब्द लिहा**

सांधणे, मंदिर, वावर.

**विरुद्धार्थी शब्द लिहा**

सांधणे, पुण्य, मरणे, बाप.

**उपक्रम :**

1) तुम्ही प्राणी, पक्षी यांच्यासाठी केलेल्या चांगल्या कामाचे आठ ते दहा ओळीत वर्णन करा.

2) तुमच्या आजूबाजूला असणाऱ्या पक्ष्यांची काळजी कशी घेता ते सांगा.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

****

# 8. लपे करमाची रेखा

C9M5J4

**परिचय :** **बहिणाबाई चौधरी (1880–1951)** खानदेशातील खेड्यात शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. जन्मजात त्यांना काव्यप्रतिभा लाभली होती. निरक्षर असूनही त्यांच्या कवितेतून जीवनाच्या साफल्याचे दर्शन घडते. ग्रामजीवन, संस्कृती व निसर्ग यांचे सुरेख चित्रण त्यांच्या काव्यातून होते. 'बहिणाबाईची' गाणी हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. अनुभवाचा अस्सलपणा, सुंदर कल्पकता, गेयता, कल्पना विलास, बोलीभाषेचा गोडवा ही त्यांच्या कवितेची वैशिष्ट्ये आहेत. 'निसर्गकन्या' म्हणूनही त्यांचा गौरव केला जातो.

प्रस्तुत कविता 'बहिणाबाईंची गाणी' या प्रसिद्ध कविता संग्रहातील असून ती 'अहिराणी' बोलीतील कविता आहे. प्र. के. अत्रे यांनी बहिणाबाईंच्या कवितांबद्दल 'हे बावन्नकशी सोने आहे' असे उद्गार काढले होते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – अंधश्रद्धेवर प्रहार)



लपे करमाची रेखा,
माझ्या कुकवाच्या खाली.
पुशीसनी गेलं कुकू,
रेखा उघडी पडली.

देवा, तुझ्याबी घरचा,
झरा धनाचा आटला.
धन रेखाच्या चऱ्यानं,
तयहात रे फाटला.

बापा, नको मारू थापा,
असो खऱ्या असो खोट्या.
नही नशीब नशीब,
तयहाताच्या रेघोट्या.

अरे, नशीब नशीब,
लागे चक्कर पायाले.
नशिबाचे नऊ गिऱ्हे,
ते भी फिरत राह्याले.

राहो दोन लाल सुखी,
हेच देवाले मांगन.
त्यात आलं रे नशीब,
काय सांगे पंचागन.

नको नको रे जोतिषा,
नको हात माझा पाहू.
माझं दैव माले कये,
माझ्या दारी नको येऊ !

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :** करम – कर्म, लपे – झाकणे. करमाची रेखा – कर्माची रेषा. पुशीसनी – पुसून. कुकू – कुंकू. कर्माची रेखा उघडी पडणे – नशीब उघडे पडणे, आटने – कमी होणे, सुकणे. चरा – ओरखडा. तयहात– तळहात. नशीब – दैव. थापा – खोट्या बढाया. रेघोट्या – रेखा. चकर – चाक, चक्र. पायाले – पायाला. नऊ गिऱ्हे – नवग्रह. लाल – मुले, बालक. देवाले – देवाकडे. मांगनं – मागणे. पंचागन – पंचांग. जोतिषा – भविष्य सांगणारा. माले – मला. कये–कळे.

**कवितेच सरळ अर्थ (भावार्थ) :** लपे करमाची रेखा' या कवितेत बहिणाबाईनी वास्तव जीवनाचे वर्णन केले आहे. बहिणाबाईंच्या कविता हे त्यांच्या अनुभवाचे बोल आहेत. संसारात पती आणि पुत्र हे स्त्रीजीवनाचे दोन ध्रुवच असतात. ती त्यांच्या आधाराने जगते, त्यांच्यासाठी कष्ट उपसते, अशावेळी पतीचा आधार तुटला की स्त्री निराधार होते. वैधव्याने दुःखाचा डोंगर तिच्यावर कोसळतो. ती दुःखाने खचते, एकाकीपणाने उदास होते. देव, ज्योतिष, भविष्य याचा आधार घेऊ लागते, असे सामान्यतः दिसते. पण बहिणाबाई, मात्र अशा प्रसंगात या सर्वांवर मात करते, उरातले दुःख गाडून, जिद्दीने संकटाशी झुंज देते. आत्मविश्वासाने कर्तव्याला सामोरी जाते, हस्तरेषा – ग्रहमान यांना तुच्छ मानून दुःखासह संसारावर प्रेम करते. ज्योतिषा माझ्या दारावर येऊ नकोस कारण माझे नशीब माझ्या हातात आहे. असे ती या कवितेतून व्यक्त करते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) कुंकवाखाली कोणती रेखा लपली आहे ?

2) तयहात कशाने फाटला आहे ?

3) नशीबाचे किती गिऱ्हे आहेत ?

4) बहिणाबाईंचे देवाकडे कोणते मागणे आहे ?

5) पंचागनला काय म्हणतात ?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) हातावरच्या धनरेषेबद्दल बहिणाबाईंना काय वाटते ? तो भाव ती कोणत्या शब्दातून व्यक्त करते ?

2) 'नशीबाची रेखा कशामुळे उघडी पडली आहे ?

3) 'नशीबाचे नऊ गिऱ्हे – ते बी फिरत राहिले' या ओळींचा आशय स्पष्ट करा.

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) बहिणाबाई ज्योतिष्याला आपल्या दारी येऊ नको असे का म्हणते ?

2) नशीब म्हणजे काय आहे, हे बहिणाबाईने कसे सांगितले आहे.

**भाषाभ्यास :**

**खालील अहिराणी भाषेतील शब्द प्रमाण मराठीत लिहा.**

| करम | तयहात | नऊगिऱ्हे | कुकू | चकर | पंचागन |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**उपक्रम :**

1) या कवितेमधील बोलीभाषेतील शब्द प्रमाण भाषेत लिहा.

2) नवग्रह कोणते त्यांची माहिती मिळवा.

3) कवितेला चाल लावून वर्गात गायन करा.

****

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# 9. दुष्काळ ओलाही, कोरडाही

L6B4X3

**परिचय : हर्षदा सुंठणकर –** या एक युवा कवयित्री आहेत. गुजरात साहित्य अकादमी, गुजरात सरकार युवा सांस्कृतिक विभागातर्फे साहित्यप्रयोग या राष्ट्रीय सेमिनार आणि कविसंमेलनासाठी त्या निमंत्रित कवयित्री होत्या. त्यांची 'बाई' ही कविता मराठवाडा विद्यापीठांमध्ये अभ्यासात समाविष्ट केली आहे. त्यांचा 'कपडे वाळत घालणारी बाई' हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यांना मराठी वाङ्‍मय परिषद बडोदा यांचा पुरस्कार मिळाला आहे. याशिवाय वाङ्‍मय चर्चा मंडळ बेळगाव यांचा कृ.ब. निकुंब पुरस्कार, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा विशेष पुरस्कार, नरेंद्र विद्यापीठाचा न.ना. देशपांडे पुरस्कार, असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांनी कविता वाचन केले आहे.

प्रस्तुत कविता 'कपडे वाळत घालणारी बाई' या कवितासंग्रहातून घेतली आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

(मूल्य – वास्तवदर्शीपणा)



मी इकडे सांगलीला,
पुराच्या वेढ्यात,
पाऊस थांबण्याची वाट बघत,
चहूकडे पाणीच पाणी फक्त.

घरे पडलेली,
गुरे मेलेली,
वस्तू वाहून गेलेल्या,
भविष्याची चिंता,
अतिवृष्टीचा प्रलय !

याचवेळी,
तिकडे मराठवाड्यात
माझी मैत्रीण,
पावसाची आतुरतेने
वाट पाहणारी,
धरणात अपुऱ्या
पाणीसाठ्याच्या बातम्या,
दरवर्षी पाऊस झाला,
तरी वर्षभर
पाण्याचा तुटवडाच.

यंदा तर अजून
पाऊस झालाच नाही,
हा उन्हाळा कठीण जाणार
भविष्याची चिंता,
अनावृष्टीचा हाहाःकार !

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



माझ्या मनात उमटणारी
प्रत्येक हिरवीगार कविता
मी मैत्रिणीला पाठवते
सोशल मीडियावरून.

माझ्या आजूबाजूला साचलेलं
पाणीच पाणी मात्र
कसं पाठवायचं तिला,
कोणी सांगाल का?

**शब्दार्थ :** अतिवृष्टी – अती पाऊस. अनावृष्टी – कमी पाऊस. वेढ्यात – गराड्यात. गुरे – जनावरे. चिंता – काळजी, फिकीर. प्रलय – संहार, नाश. आतुर – उत्सुक. तुटवडा – कमीपणा, कमतरता, तुट. हाहाःकार – आक्रोश, विलाप. उमटणारी – स्पष्ट. दुष्काळ – आपत्तीचा काळ. कोरडा – सुका. बातम्या – वार्ता. धरण – बंधारा, बांध.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.**

1) प्रलय कशाचा आहे ?
2) मराठवाड्यातील मैत्रीण कशाची आतुरतेने वाट पाहत असते ?
3) वर्षभर कशाचा तुटवडा असतो ?
4) मनात उमटणारी कविता कशी आहे ?
5) माणसे कुठे अडकली आहेत ?
6) वर्तमान पत्रात कोणत्या बातम्या आल्या आहेत?
7) कवयित्रीची मैत्रीण कुठे राहते?
8) कवयित्री आपली कविता कोठून पाठवते ?
9) कवयित्रीच्या आजूबाजूला काय आहे ?
10) कवितेत आलेल्या दोन समस्या कोणत्या ?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा.**

1) पुरामुळे काय काय घडले आहे ?
2) उन्हाळा कठीण जाणार आहे असे कवयित्रीला का वाटते ?
3) कवयित्रीच्या मनातील कविता कशा आहेत व त्या कवितांचे ती काय करते?
4) कवयित्रीला कोणता प्रश्न पडला आहे ?
5) मराठवाड्यातील मैत्रिणीविषयी कवयित्रीला काय वाटते ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच ते सहा ओळीत लिहा.**

1) कवितेत आलेल्या पुराचे वर्णन करा.
2) कवितेत आलेल्या दुष्काळाचे वर्णन करा.
3) दुष्काळ, ओलाही- कोरडाही हे शीर्षक स्पष्ट करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## भाषाभ्यास :

### खालील शब्दांचे समानार्थी शब्द सांगा

पर्जन्य, पाणी, चिंता, तुटवडा, प्रलय

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

### खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द सांगा

अतिवृष्टी, अनावृष्टी, उन्हाळा, ओला, मैत्रीण

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

### खालील ओळीतील अधोरेखित शब्दांचे विभक्ती प्रत्यय सांगा

अ) पाऊस थांबण्याची वाट बघत

आ) पावसाची आतुरतेने वाट पाहणारी

इ) तिकडे मराठवाड्यात माझी मैत्रीण

## उपक्रम :

1) 'पुरग्रस्तांचे मनोगत' या विषयावर पंधरा ते वीस ओळीत निबंध लिहा.

2) दुष्काळी प्रदेशातील लोकांचे जीवन कसे आहे याची माहिती मिळवून त्या माहितीचे वाचन वर्गात करा.

****

NOT TO BE REPUBLISHED @ KTBS

# 10. जादूगार

**परिचय :** **विंदा करंदीकर (जन्म 1918 मृत्यू 2010)** पूर्णनाव – गोविंद विनायक करंदीकर. हे ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी आहेत. 'अष्टदर्शने' या साहित्यकृतीसाठी त्यांना हा पुरस्कार मिळाला आहे. त्यांचे शालेय शिक्षण रत्नागिरी येथे झाले व कॉलेज शिक्षण कोल्हापूर येथे झाले. सुरवातीच्या काळातच आर. पी. डी. कॉलेज बेळगाव येथे त्यांनी इंग्रजीचे अध्यापन केले. मुंबई येथील रुईया कॉलेजात ते इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांनी जुन्या विषयात नवीन तेज व ओज ओतून काव्यलेखन केले. 'स्वेदगंगा,' 'मृद्गंध,' 'संहिता,' 'जातक,' 'धृपद,' 'विरूपिका' हे त्यांचे काव्यसंग्रह, त्यांनी बालसाहित्यही लिहिले आहे. सामाजिक अन्यायाचे. भेदक दर्शन, दलितांविषयी सहानुभूती हे त्यांच्या काव्याचे विशेष. काही नाजुक प्रेमगीतेही त्यांनी लिहिली. काव्य, समीक्षा, अनुवाद, असे विविध साहित्य प्रकार त्यांनी हाताळले.

प्रस्तुत कविता विंदा करंदीकर यांच्या 'स्वेदगंगा' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेचा काव्यप्रकार 'नाट्यगीत' हा आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

(मूल्य – कुटुंबप्रेम)



आई : मोठा झाल्यानंतर रे
होणार अरु कोण बरे ?
अरु : मी तर होईन जादूगार
गंमत जंमत मी करणार
घेईन रंगीत पेटारा
जादूचा मालच न्यारा,
मुंगूस बेडूक नाग असे
वळवळ करतील आत कसे,
जादूचे मंत्रच भारी
जादूची डमरू टिपरी.

वाजवीन मी मग पुंगी
सापांना आणिन गुंगी,
मुंगुस घालुन पोत्यात
फुरशाने मारिन गाठ ।
घींसाचा चाबूक बडा
वाजवीन मी तडातडा.
डमडम डमरु
टिपरी टरुरु,
मुळीच तुम्ही भिऊ नका;
मंत्र-तंत्र हे उगाच कां?

म्हणाल जादूगार खरा
असा पाहिला ना दुसरा ।
भस्म मंत्रुनी उंच उडे
पैशाचा पाऊस पडे.
शेजारील पोरे सारी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

धावत येतिल सामोरी;
ती करतिल गोळा पैसे
आणिक भरतिल सर्व खिसे.
डमडम डमरु
टिपरी टरुरु.
चोर घरी मग पळतिल ते
रडतिल पाहुन खिसे रिते।

कुरुप नी काळी ताई,
आणिक शिकलेली नाही,
पसंत कोणा ना पडते;
खोली लावुन मग रडते,
चिंता परि ना असे मला;
मी तर गे जादूवाला.
डमडम डमरु
टिपरी टरुरु
राजाचा मुलगा दारी,
ताईचा मग शोध करी,
म्हणेन मी–चल जा नाही
मिळणारच अमुची ताई.
करील मग तो गयावया
आणिक येईल मला दया.
राजपुत्र हा थोर जरी,
तो नवरा, ताई नवरी.

खरेच आई तुला नवी,
धडकी लुगडी दोन हवी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

कमळीचा परकर सगळा
अगदी बघ फाटुन गेला;
भाऊला बघ लंगोटी,
नकोच का याहुन मोठी?
बाबांना पंचा–बदली
हवी धोतरे लांब भली.
डमडम डमरु
टिपरी टरुरु
पडला पुढती ढीग पुरा
काय कमी जादूगारा?
आई : नको नको बोलू बाळा
थांब थांब रे लडिवाळा
अरू : नको कोण तू म्हणणार
होईन मी जादूगार

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शब्दार्थ :** पेटारा– मोठी पेटी. गंमत जंमत – मौजमजा. न्यारा – वेगळा. माल–सामान. गयावया करणे – विनंती करणे. वळवळ– किडा, मुंगी, साप याची हालचाल. पुंगी – सापाला गुंगी आणणारे जादूगाराचे वाद्य. गुंगी – धुंदी, भस्म – विभूती, डमरू – आवाज करणारे जादूगाराचे वाद्य. फुरशे– बिन विषारी साप काथ्याच्या दोरीच्या आकाराचा असतो. घींस– ग्रीस, एक तेल. राजपुत्र – राजाचा मुलगा. दया– कळवळा. धडकी – न फाटलेली लुगडी, साड्या, पंचा – अंग पुसण्यास वापरण्यात येणारे पातळ कपडा. ढीग – रास. चिंता – काळजी. रिते – रिकामे. कुरूप – विद्रूप. लडिवाळा – लाडका, प्रेमळ.

**कवितेचा सरळ अर्थ : (भावार्थ)**

'जादूगार' ही कविता विंदा करंदीकराच्या 'स्वेदगंगा' या काव्यसंग्रहातून घेतली आहे. या कवितेत आई व तिचा मुलगा अरू यांचा संवाद आहे. अरु मोठा होऊन जादूगार

होणार आहे. जादूच्या रंगीत पेटाऱ्यातून साप, मुंगुस, बेडूक या वस्तू आणि जादुचे मंत्र यांच्या सहाय्याने जीवनातील अभाव तो नष्ट करणार आहे. कुरूप आणि काळ्या ताईला राजकुमारासारखा नवरा आणणार आहे. पैशाचा पाऊस पाडून दारिद्र्य नष्ट करणार आहे. घरातील लोकांना नवे कपडे आणणार आहे. आपल्या मुलांचे हे सारे बोलणे ऐकून त्याच्या आईचा जीव अभिमानाने भरून येतो. ती त्याला बाळा असे बोलू नको रे असे म्हणते. आपल्या पोराचे हे लडिवाळ शब्द ऐकून त्याला कोणाची नजर लागेल असे तिला वाटले. पण तिच्या या प्रेमळ काळजीकडे त्याचे लक्ष नाही. तो तिलाच म्हणतो नको कोण तू म्हणणार ? कारण मी जादूगार आहे. जादूने मी सारे करणारच हा लहानसा मुलगा आहे आणि जीवनातील दुःख नष्ट करण्याची भाषा बोलत आहे.

## स्वाध्याय

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**प्रश्न 1. खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) अरु मोठा झाल्यावर कोण होणार आहे ?
2) जादुगार झाल्यानंतर अरू काय करणार आहे ?
3) जादुचा माल कसा आहे ?
4) अरु कशाचा पाऊस पाडणार आहे ?
5) अरूच्या बहिणीचे नाव काय आहे ?
6) ताईला शोधत कोण येणार आहे?

**प्रश्न 2. खालील प्रश्नांची उत्तरे दोन – तीन वाक्यात लिहा.**

1) जादूगाराच्या पेटाऱ्यात काय काय आहे?
2) अरु, साप व मुंगसाला काय करणार आहे ?
3) चाबूक, डमरू, टिपरीचा आवाज कसा येतो ?
4) शेजारची पोरे काय करणार आहेत ?

**प्रश्न 3. खालील प्रश्नांची उत्तरे पाच – सहा वाक्यात लिहा.**

1) अरुच्या ताईचे वर्णन करा ?

2) आई – बाबा, भाऊ बहीण यांना अरू काय आणणार आहे ?

**भाषाभ्यास :**

**खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द सांगा.**

दादा, राजपुत्र, नवरा

**उपक्रम :**

1) शाळेत जादूचे प्रयोग करून दाखवा.

2) 'शाळेतील अभ्यास' या विषयावर आई – मुलगा/मुलगी यांच्यातील संवाद लेखन करा.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

****

# व्याकरण विभाग

## वृत्ते

मागील वर्षाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तुम्ही वृत्त कशाला म्हणतात व ते कसे ओळखावे हे शिकला आहात. इंद्रवज्रा, भुजंगप्रयात, वसंततिलका, मालिनी या वृत्तांची ओळख करून घेतली आहे, तर यावर्षी आपण मंदाक्रांता व शार्दुलविक्रिडीत या वृतांचा अभ्यास करूया.

### भुजंगप्रयात :

उदा. : मना सज्जना तू कडेनेच जावे
न होऊन कोणासही दूखवावे
कुणी दुष्ट अंगास लावील हात
तरी दाखवावा भुजंगप्रयात

| | | | |
|---|---|---|---|
| न हो ऊ | न को णा | स ही दू | ख वा वे |
| U – – | U – – | U – – | U – – |
| य | य | य | य |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**वृत्ताचे नाव : भुजंगप्रयात**

**लक्षणे :**

- हे अक्षरगणवृत्त आहे.
- अक्षरे : प्रत्येक चरणात बारा अक्षरे असतात.
- गण : – य – य – य – य.
- यती : – 6 व्या अक्षरावर.

## वसंततिलका :

उदा. : आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश
फेकी रसाल तरूही मधुगंधपाश
ऐकू न ये तुज पिकस्वर मंजुळे का ?
वृत्ती वसंततिलका न तुझी खुळे का ?

| आ र क्त | हो य फु | लु नी प्र | ण यी प | ला श |
|---|---|---|---|---|
| – – U | – U U | U – U | U – U | – – |
| त | भ | ज | ज | ग ग |

**वृत्ताचे नाव : वसंततिलका**

**लक्षणे :**

- हे अक्षरगणवृत्त आहे.
- अक्षरे : प्रत्येक चरणात 14 अक्षरे.
- गण : त – भ – ज – ज – ग – ग.
- यती : 8 व्या अक्षरावर.

## मालिनी :

उदा : पखरण बघ घाली भूवरी पारिजात
परिमल उधळी हा सोनचाफा दिशात
गवतहि सुमभूषा दाखवी आज देही
धरणि हरितवस्त्रा मालिनी साजते ही

| प रि म | ल उ ध | ळी हा सो | न चा फा | दि शा त |
|---|---|---|---|---|
| U U U | U U U | – – – | U – – | U – – |
| न | न | म | य | य |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**वृत्ताचे नाव : मालिनी**

**लक्षणे :**

- हे अक्षरगणवृत्त आहे.
- अक्षरे : प्रत्येक चरणात 15 अक्षरे.
- गण : - न.न.म.य.य.
- यती : 8 व्या अक्षरावर.

**खालील चौकोनातील रिकामी जागी योग्य माहिती भरून वृत्त ओळखा:**

1) उदा : आरक्त होय फुलुनी प्रणयी पलाश

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ............. | ............. | ............. | **ण यी प** | **ला श** |
| – – U | ............. | U – U | U – U | – – |
| **त** | **भ** | | **ज** | **ग ग** |

**वृत्ताचे नाव : वसंततिलका**

लक्षणे : ........................ अक्षरे : प्रत्येक चरणात 14 अक्षरे

गण : त – भ – ज – ज– ग गयती : ..............................

2) उदा : पखरण बघ घाली भूवरी पारिजात

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ............. | **ल उ ध** | **ळी हा सो** | ............. | **दि शा त** |
| U U U | U U U | ............. | U – – – | U – – – |
| न | ............. | म | ............. | ............. |

**वृत्ताचे नाव :**

लक्षणे : ........................ अक्षरे :..............................

गण : ........................ यती :..............................

**मंदाक्रांता :**

उदा – मेघांनी हे गगन भरता गाढ आषाढमासी.

होई पर्युत्सुक विकल तो कांत एकांतवासी

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

तन्नि:श्वास श्रावून रिझवी कोन त्याच्या जिवासी ?
मंदाक्रांता सरस कविता कालिदासी विलासी

| मे घा नी | हे ग ग | न भ र | ता गा ढ | आ षा ढ | मा सी |
|---|---|---|---|---|---|
| – – – | – U U | U U U | – – U | – – U | – – |
| म | भ | न | त | त | ग ग |

लक्षणे : हे अक्षरगणवृत्त आहे.
अक्षरे : प्रत्येक चरणात सतरा अक्षरे येतात.
गण : म – भ – न – त – त – ग – ग .
यती : चौथ्या व सहाव्या अक्षरावर येते.

## शार्दूलविक्रीडित :

उदा – भाषा संस्कृति थोर एकच महाराष्ट्रा, तुझी देख रे
नाना धर्म असंख्य जाति असती अद्यापि सारे खरे
भेदांनी परी या किती दिन तुवा व्हावे त्रिधा पीडित
ताणूनी अपुले स्वरूप कर तू शार्दूलविक्रीडित

| ना ना ध | र्म अ सं | ख्य जा ति | अ स ती | अ द्या पि | सा रे ख | रे |
|---|---|---|---|---|---|---|
| – – – | U U – | U – U | U U – | – U – | – U – | – |
| म | स | ज | स | त | त | ग |

लक्षणे : हे अक्षरगणवृत्त आहे.
प्रत्येक चरणात एकोणीस अक्षरे येतात.
गण : म – स – ज – स – त – त – ग .
यती बारा व्या अक्षरावर.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# भाषण

बोलणे ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. बोलून स्वत:ला अभिव्यक्त करणे हे मानवाचे व्यवच्छेदक लक्षण आहे.आपल्या मनातील भावना, विचार दुसऱ्याला सांगणे या आंतरिक ऊर्मिनेच माणूस आपोआप बोलू लागतो.म्हणून बोलतो तो माणूस अशीही माणसाची एक व्याख्या होऊ शकेल.

नुसते बोलणे वेगळे आणि मुद्देसुद, नेमके शब्दयोजना करून प्रभावीपणे बोलणे वेगळे. असे प्रभावी बोलता ही एक कला आहे. सरावाने, अभ्यासाने हे कौशल्य आत्मसात करावे लागेल.

- एखाद्या विषयावर श्रोत्यांपुढे केलेले अभ्यासपूर्ण विवेचन म्हणजे भाषण होय.
- भाषण लिहिताना ते कोणत्या गटासमोर सादर करायचे आहे त्याचा विचार करणे आवश्यक असते.
- दिलेल्या विषयाची सूत्रबद्ध मांडणी करताना ती एकसुरी होऊ नये याची काळजी घ्यावी.
- श्रोत्यांना अप्रत्यक्षपणे त्यात सहभागी करून घेतल्याची जाणीव व्हावी. श्रोत्यांना उद्देशून संवादी भाषा हवी, आवाहन हवे.
- भाषणाच्या वेळाचा विचार करून आशय नेमकेपणाने व प्रभावीपणे श्रोत्यांपर्यंत पोचावा याची काळजी घ्यावी

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## पुढील विषयावर भाषण तयार करा

1. झाडे लावा झाडे जगवा
2. देशभक्ती
3. पर्यावरण रक्षण संस्कृती
4. भारत माझा देश आहे

# वृत्तांत लेखन

वर्तमानपत्रातील बातमी आणि वृत्तांत लेखन यात फरक आहे.

एखादी घटना/प्रसंग/समारंभ घडल्यानंतर ताडतोब दिले जाणारे वृत्त म्हणजे बातमी. पण ते घडून गेल्यानंतर नजीकच्या काळात त्यासंबंधी स्वतंत्र असा वृत्तांत तपशिलाने लिहिला जातो. वृत्तांत लिहितानाचे क्रमवार तपशील.

## वृत्तांत लेखन करताना :

- विषयानुरूप त्या त्या प्रसंगाचे स्वरूप, उद्दिष्ट, माहिती द्यावी.
- प्रसंगाशी निगडित वा कार्यक्रमात सहभागी झालेल्या व्यक्ती यांचा ओझरता परिचय द्यावा.
- आवश्यकतेप्रमाणे वक्त्याच्या भाषणातील काही अंश वृत्तांत लेखनात घालावा.
- वृत्तलेखकाचा स्वतःचा अभिप्राय/प्रतिक्रिया द्यावी.

वृत्तलेखनातून लिहिणाऱ्याचा त्याविषयाचा अभ्यास, विचार नकळत प्रगट होतात. त्यामुळे वृत्तांत लिहिताना औपचारिक तरीही परिणामकारक शैली अपेक्षित आहे. घडलेल्या घटना, कधी, कोठे, का, कोणाच्या, संदर्भात घडली आहे त्याचे सम्यक चित्र वृतांत वाचणाऱ्याच्या नजरेसमोर उभे राहिले पाहिजे.

## पुढील विषयावर वृत्तांत लेखन करा

1. वाढते अपघात
2. फुलांचे उद्धाटन
3. शाळेचे संमेलन
4. शाळेतील क्रीडा स्पर्धा
5. व्याख्यानमाला
6. आठवडी बाजार

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## मुलाखत

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवन कार्य लोकांपर्यंत पोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे मुलाखत होय. मुलाखतीचे प्रामुख्याने प्रत्यक्ष मुलाखत घेणे आणि नंतर ती शब्दबद्ध करणे हे दोन भाग पडतात. मुलाखत घेताना स्वतः कमीतकमी बोलून समोरच्या व्यक्तीला बोलते करण्याची आवश्यकता असते. मुलाखतीचा हेतु त्या व्यक्तीविषयीची सर्व माहिती, काम इ. बद्दलचे पूर्वज्ञान मुलाखत घेणाऱ्याला अवश्य असायला हवे. मुलाखत घेणाऱ्या व्यक्तीबद्दलचा योग्य तो आदर, आब राखत योग्य त्या शब्दात जवळकीने सुसंवाद साधता आला पाहिजे. प्रश्नांमधीत कृत्रिमता टाळत सहज संवादी पद्धत वापरून त्यातील ओघ जपला तर मुलाखत प्रभावी ठरते, उत्तरोत्तर रंगत जाते.

### मुलाखत संवादरूपात लिहिताना

- थेट प्रश्नोत्तराला सुरुवात न करता सुरुवातीला प्रास्ताविक परिच्छेद असावा. यातून त्या व्यक्तीची थोडक्यात ओळख, मुलाखतीचा उद्देश वाचकांपर्यंत पोचावा.
- मुलाखत प्रश्नोत्तर स्वरूपात असावी. प्रश्न थोडक्यात, नेमके असावेत. उत्तरे मात्र सविस्तर असावीत.
- प्रत्यक्ष घेतलेली मुलाखत लिहायची असल्यास ती आकर्षक पद्धतीने संपादित करून लिहू शकता.
- थेट मुलाखत लिहिताना विषय नेमका काय आहे, हे समजून घ्यावे मुलाखत ज्याची घ्यायची आहे त्याचा हुद्दा, नाव दिले असेल तर यात व्यक्तीबद्दल आपल्याला जास्त माहिती आहे की हुद्याबद्दल हे लक्षात घेऊन मुलाखत लिहिण्याचा प्रयत्न करावा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## पुढील व्यक्तींची प्रत्यक्ष मुलाखत घ्या

- डॉक्टर
- पोलीस अधिकारी
- मुख्याध्यापक
- समाजसेवक
- पर्यावरणवादी
- कलावंत

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## अर्ज लेखन

**1) बँकेत लिपिकाच्या जागेसाठी अर्ज करा.**

प्रेषक,
सार्थक किरण पाटील.
निपाणी.
पिनकोड - 591215.
तारीख 29 -1- 2025.

प्रति,
माननीय चेअरमन साहेब,
जिल्हा मध्यवर्ती बँक निपाणी.
ता. जि. बेळगाव.

**विषय : बँकेत लिपिक म्हणून जागा मिळणेबद्दल.**

महोदय,

मी सार्थक किरण पाटील निपाणीचा रहिवासी आहे. आपण दिलेल्या 'दैनिक तरुण भारत' दिनांक 25/1/2025 च्या जाहिरातीवरून मी लिपिकच्या जागेकरिता हा अर्ज करत आहे. माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून मला आपल्या बँकेत सेवेची संधी द्यावी. मी माझे काम प्रामाणिकपणे पूर्ण करेन. माझी संपूर्ण माहिती अर्जाखाली दिली आहे.

धन्यवाद.

आपला विश्वासू,
सार्थक किरण पाटील.

अर्जदाराची माहिती :
पूर्ण नाव : सार्थक किरण पाटील.
पूर्ण पत्ता : मु. पो. निपाणी.
तालुका : निपाणी
जिल्हा : बेळगाव
पिनकोड - 591215
अवगत भाषा : कन्नड, मराठी, हिंदी, इंग्लिश.
शैक्षणिक पात्रता :एम. कॉम.
संगणकाचे ज्ञान आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**पत्ता :**

प्रति.

चेअरमन

जिल्हा मध्यवर्ती बँक, निपाणी.

ता. जि. बेळगाव.

**2) तुम्ही इयत्ता दहावी पास झाला आहात. पुढील शिक्षणासाठी शाळा सोडल्याचा दाखला मागणी अर्ज मुख्याध्यापकांना करा.**

प्रेषक,

जी. रिया. के

सर्वोदय सी बी एस सी

हायस्कूल,

संकेश्वर.

ता. हुक्केरी

दिनांक :1 जून 2025.

प्रति.

माननीय मुख्याध्यापक,

सर्वोदय हायस्कूल,

संकेश्वर.

ता. हुक्केरी

**विषय : शाळा सोडल्याचा दाखला मिळणेबद्दल.**

महोदय ;

मी जी. रिया. के. आपल्या हायस्कूलची विद्यार्थिनी असून, सन 2024-25 मध्ये के. एस. सी. बोर्ड बेंगलोर यांनी घेतलेल्या, एस.एस. एल.सी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहे. माझ्या पुढील शिक्षणासाठी शाळा सोडून महाविद्यालयात जात आहे. त्यासाठी मला दाखल्याची आवश्यकता आहे. तरी कृपया करून मला माझा दाखला लवकरात लवकर मिळावा ही विनंती.

कळावे,

आपली आज्ञाधारक विद्यार्थिनी

जी .रिया.के .

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# जाहिरात लेखन

विद्यार्थ्यांनो, मागील इयत्तांमध्ये तुम्हांला 'जाहिरात' या घटकाची ओळख झालेली आहे. विविध वस्तू अथवा सेवा या चांगल्या कशा आहेत, हे जाहिरातींद्वारे पटवून दिलेले असते.

जाहिरात म्हणजे 'जाहीर करणे' होय. इंग्रजीत 'जाहिरात' या शब्दासाठी "Advertisement' हा शब्द वापरला जातो. जाहिरातीचा मुख्य उद्देश वस्तू किंवा सेवांकडे ग्राहकांचे लक्ष वेधून घेणे व त्यांची मागणी निर्माण करणे असा असतो. त्याचबरोबर शासन व काही समाजसेवी संस्था यांच्यातर्फे समाजप्रबोधनासाठी व जनहिताय काही जाहिराती प्रसिद्ध केल्या जातात. जाहिरात ही एक कला आहे. तुम्ही अनेक जाहिरातींचे वाचन, निरीक्षण व श्रवणही करत असता. त्यांचे तुम्हांला आकलन होणे, हे आजच्या काळातील आवश्यक कौशल्य आहे.

जाहिरातीच्या श्रवण व वाचनाने जाहिरातीतील उत्पादनाबद्दल/सेवेबद्दल माहिती मिळणे व विक्रेता म्हणून इतरांच्या मनात त्याबद्दल कुतूहल, आकर्षण निर्माण करणे ही दोन्ही कौशल्ये आत्मसात करणे, हा जाहिरात या घटकाच्या अभ्यासाचा मूळ हेतू आहे.

©MTBS NOT TO BE REPUBLISHED

## खालील जाहिरातीचे वाचन व निरीक्षण करून जाहिरात तयार करा.

**जिल्हा परिषद उच्च माध्यमिक डिजिटल शाळा, बेळगाव.**

**प्रवेश सुरू**

**आपला प्रवेश आजच नोंदवा.**

**इयत्ता पहिली ते आठवी**

शाळेची वैशिष्ट्ये

(1) डिजिटल शाळा
(2) ई-लर्निंग सुविधा
(3) वैयक्तिक मार्गदर्शन
(4) पालकांसाठी SMS सुविधा
(5) सांस्कृतिक कार्यक्रमांतून कलागुणांचा विकास
(6) क्रीडा स्पर्धांचे आयोजन

विद्यार्थी योजना

(1) मोफत प्रवेश
(2) मोफत पाठ्यपुस्तके
(3) मुलींना उपस्थिती भत्ता
(4) इतर विविध योजना

**100% गुणवत्तेची हमी**

**सौजन्य : शाळा सुधारणा समिती**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

# पूरकवाचन

## 1) शिल्पा दऱ्याबा चव्हाण

**– रघुराज मेटकरी**

मी रेवणगाव येथे शिक्षक होतो. डोंगरमाथ्यावरचे हे गाव. त्या मारुतीच्या मंदिरात शाळा भरत असायची. गावकऱ्यांनी मंदिराच्या गाभाऱ्यात चार खोल्या ? त्यांत एकेक वर्ग भरायचा.

या गावात चव्हाण नावाचे कुटुंब आले. कुटुंब घिसाडी समाजाचे होते मंदिराच्या बाहेर रस्त्याच्या कडेला त्यांनी पाल उभे केले. भाता पालाबाहेर ठेवलेला होता. भात्यावर दोरी ओढीत म्हातारा, कधी म्हातारी, तर कधी चव्हाणाची आडवे कुंकू कपाळाला लावलेली पत्नी भाता ओढीत बसायची.

दऱ्याबा घिसाडी ऐरणीवर लोखंड ठोकीत बसलेला असायचा. भात्या पुढे ठेवलेल्या कोळशातून भाता हलू लागला की अंगार फुलायचे. त्यात ठेवलेले लोखंड लाल इंगळासारखे तापायचे. ते चिमट्याने धरून दऱ्याबा त्यावर हातोडीने ठोके घालायचा आणि लोखंडाला हवा तो आकार द्यायचा. यात फार मोठे कसब होते. लोखंडाच्या पट्टीचे तो खुरपे, विळा. कोळप्याच्या पट्या बनवायचा. कुळवाची पट्टी बनवायचा. बैलगाडीच्या चाकाच्या धावा बनवायचा. कुऱ्हाडी, हातोडे बनवायचा.

शाळेत जायच्या वयाची चार मुले या घिसाड्याच्या पालात होती. आमची शाळा भरायची तेव्हा तर ही मुले पालाच्या बाहेर येऊन मुलांकडे पाहत बसायची.

दऱ्याबा चव्हाण भात्यावर ही हत्यारे बनवून द्यायचा. शेतकरी कुटुंबासाठी खुरपी, विळा, कुऱ्हाडी, शेतीची अवजारे अत्यावश्यक असायची; त्या कामाचे बयते तो उकळायचा. सहा-सात पोती धान्य जमवायचा. प्रतिवर्षी चांगले महिना, दोन महिने

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

त्याचा तळ गावात असायचा. त्याची एक गाय, म्हैस व एक बैल आणि बैलगाडी होती. आपले पाल ठोकायचा, त्याच्या जवळपास ही जनावरे बांधायचा. म्हातारा, म्हातारी किंवा त्याची पत्नी तर कधी स्वतः दऱ्याबा वेळ मिळेल तशी जनावरे हिंडवायला जायचे. या गावात एक-दोन महिने झाले की, तो आपला बारदान शेजारच्या गावी हलवायचा. एका बैलाची गाडी जुंपून भाता, कोळसे व धान्य भरून पुढल्या गावी जायचा. त्याचा सर्व कुटुंबकबिलाही पुढल्या गावाला चालत जायचा.

एक दिवस मुख्याध्यापकांच्या मनात काय आले, कोणास ठाऊक ! त्यांनी मला सोबत घेतले आणि आम्ही त्या दऱ्याबाच्या पालासमोर गेलो. दऱ्याबा, त्याचा म्हातारा, म्हातारी, पत्नी आपले काम थांबवून आमच्याजवळ आली.

हेडगुरुजी म्हणाले, ''दऱ्याबा, आम्ही आलोय ते तुझी मुले शाळेत घेण्यासाठी. तू सगळ्या मुला-मुलींची नावे आमच्या शाळेत नोंदव आणि आजपासून मुलांना शाळेत पाठव.''

''गुरुजी, आम्ही फिरस्ती माणसं. आज हा गाव, तर उद्या तो गाव. कुठली आमच्या नशिबात शाळा? एक ना अनेक गावं आम्ही भटकणार.''

''होय, तुझे खरे आहे, पण त्यामुळे तुझे खूप मोठे नुकसान झालेले आहे. तुला कुणाला पत्र लिहिता येत नाही, कुणाचे पत्र वाचता येत नाही. एसटीचा बोर्ड वाचता येत नाही, हिशेब लिहून ठेवता येत नाही. ज्याला लिहिता-वाचता येत नाही तो अडाणी माणूस आणि डोळे असून दिसत नाही असा आंधळा माणूस सारखेच आहेत.''

''हां... हे बाकी खरे आहे.''

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘शिक्षण न घेतल्यामुळे तुझे खूप नुकसान झाले; आता मुलांचे नुकसान तरी करू नकोस. त्यांना शाळेत घाल. तू, तुझी बायको कुठेही धंदा करीत फिरा; पण गावात एक खोली भाड्याने घेऊन म्हातारा, म्हातारी ठेवा इथे. ही गाय, म्हैस पण ठेव इथे. मुलांना त्यांच्याजवळ ठेव. तू त्यांच्याकडे येऊन जाऊन करीत जा. स्थायिक झाल्यामुळे मुलांना शाळा शिकता येईल. कमीत कमी त्यांना लिहिता-वाचता, हिशोब करता तरी येईल. कुठेही असली तरी मुले तुला पत्रे पाठवतील. तुझी कागदपत्रे जपून ठेवतील, मुलांच्या आयुष्यात तरी उजेड निर्माण होईल.’’

‘गुरुजी, तुमचे सारे म्हणणे पटते मला. आम्ही विचार करून सांगतो.’ दऱ्याबा म्हणाला.

दुसऱ्या दिवशी दऱ्याबा, त्याची बायको, म्हातारे आई-बाप सर्व जण शाळेत आले. त्यांच्याबरोबर त्यांची चार मुलेही आलेली होती. थोरली मुलगी दहा वर्षांची असावी. दुसरी आठ वर्षांची, तिसरा मुलगा सहा वर्षांचा आणि सर्वांत लहान दोन-तीन वर्षांचा मुलगा होता. हेडगुरुजींनी पहिली तीन मुले दाखल करून घेतली. ‘धाकट्याला यांच्याबरोबर बसू देत, पुढील वर्षी त्याला दाखल करू. या वर्षी त्याचे वय भरत नाही’ म्हणून सांगितले.

दऱ्याबा त्याच दिवशी बारा-चौदा मैलांवरील विटे गावी गेला. मुलांना नवी कपडे, दप्तरे, पाट्या, पुस्तके, पेन्सिली घेऊन आला.

सर्व मुले वर्गात बसविण्यात आली. थोरल्या मुलीचे नाव होते शिल्पा, दुसरीचे नाव होते साधना, तिसऱ्या मुलाचे नाव होते श्रीरंग आणि धाकटा होता वसंत.

शाळा सुरू होऊन दोन महिने उलटून गेलेले होते. आम्ही प्रतिज्ञापत्रे भरून मुलांच्या नावांची नोंद केली. थोरली मुलगी शिल्पा बुद्धीने चांगली होती. कदाचित

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

वयाने मोठी असल्यामुळे तिच्या बुद्धीची ग्रहणशक्ती थोडी जास्त असावी. आणखी विशेष लक्ष देऊन शिकवल्यामुळे दीपावलीच्या सुट्टीपर्यंत मुले इतर मुलांच्या बरोबरीत आली.

रेवणगावातील कामे संपताच दऱ्याबा चव्हाण व त्याची बायको भाता व पाल गाडीत भरून दुसऱ्या गावी निघून गेली. म्हातारा, म्हातारी व मुले शाळेजवळच एक रिकामे घर भाड्याने घेऊन त्यात राहू लागली.

दीपावली सुट्टीनंतर शिल्पाला वर्गाची सेक्रेटरी केली. फळ्यावर अंक, अक्षरे लिहून दिली की शिल्पा वाचायची आणि इतर मुलांकडून वाचून घ्यायची. अंक म्हणून घ्यायची. ती मुळातच वक्तशीर आणि अभ्यासात हुशार व तरबेज होती. तिचे हस्ताक्षर सुंदर होते. कोणतीही गोष्ट सांगितली, तर ती अंगी बाणवण्याची वृत्ती तिच्यात होती. त्यामुळे लवकरच ती इतर चांगल्या श्रीमंत घरांतील मुलींसारखी अंघोळ करून, केस व्यवस्थित विंचरून, गंध-पावडर करून व स्वच्छ कपडे घालून शाळेत येऊ लागली. ती आपल्या भावंडांना स्वच्छ ठेवायची आणि शाळेत अभ्यासही वेळच्या वेळी करायची.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

शिल्पा व तिची भावंडे दोन-तीन वर्षे रेवणगावात राहिली. एवढ्या अवधीत जिद्दीने काबाडकष्ट करून दऱ्याबाने विटे शहरात गावाच्या लगत दोन-तीन गुंठे जागा विकत घेतली आणि तिथे लहानशी पत्र्याची शेड मारून त्याने आपला व्यवसाय तेथे सुरू केला. सर्व मुले, म्हातारा, म्हातारी त्याने विट्याला नेली. विट्याच्या शाळेत सर्व मुले घातली.

मुले विट्याला गेली तेव्हा सर्व मुलांना लिहिता-वाचता येत होते. गणिते सोडविता येत होती. शिल्पा तर वर्गात हुशार होती. हे कुटुंब इथेच राहिले तर शिल्पा पाचवीत जाताच तिला नवोदय विद्यालयाच्या परीक्षेला बसवायचे, पास झाली तर दऱ्याबाला समजावून सांगून ही मुलगी नवोदय विद्यालयात पाठवून तिचे पुढील शिक्षण केंद्र सरकारकडून करून घ्यायचे, असे विचार मी व हेडगुरुजी करीत होतो. पण दऱ्याबाने कुटुंबच विट्याला हलवले.

काही वर्षांनंतर... रेवणगावाजवळच रेणावी नावाचे गाव आहे. तेथे रेवणनाथांचे प्रसिद्ध मंदिर आहे. एक दिवस मंदिरात देवदर्शनासाठी गेलो होतो. दर्शन घेऊन बाहेरच्या मंडपात बसलो होतो, तेवढ्यात एक पोरगेली तरुण मुलगी आणि तसलाच तिचा नवरा माझ्याजवळ आले. माझ्या पाया पडले.

कोण आहे, हे मी भांबावून त्यांच्या चेहऱ्याकडे पाहतोय तेवढ्यात मुलगी म्हणाली, ''गुरुजी, ओळखलंत का?... मी शिल्पा आहे चव्हाणाची - दऱ्याबाची मुलगी.''

पट्‌कन माझ्या मेंदूत ओळख शिरली. अरे वा! शिल्पा तू... एवढी मोठी झालीस?

''हो. माझे लग्न झाले गेल्या महिन्यात. हे आहेत माझे मिस्टर.'' शिल्पाने ओळख करून दिली. पोरगा सावळा पण देखणा होता. मंदिराबाहेरच्या हॉटेलात दोघांना नेऊन चहा दिला.

शिल्पा म्हणाली, सातवी पास झाले. अण्णांनी काही ऐकले नाही, माझे लग्न लावून दिले. हे त्यांचेच भाचे आहेत. माझी शिकायची इच्छा होती, पण आई-वडिलांच्या पुढे आपले काय चालते?

मी मुलाला विचारले, ''उद्योग काय करता?''

तो म्हणाला, ''मी टू व्हीलरचा मेकॅनिक आहे.''

मी म्हणालो, ''छानच की... तुम्ही गाडीचे डॉक्टर आहात तर...!''

मुलगा छान हसला. ''गाडीच्या धंद्यात पैसे मिळतात, पण संगतीने व्यसने जडतात, त्यापासून सावध रहा!'' मी म्हणालो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

‘‘दारू, बिडी, सिगारेट, तंबाखू... यांना हात लावायचा नाही तरच मी लगीन करते, असं पयलं वचन घेतलंय आणि मगच लग्नाला होकार दिलाय मी. यातल्या कशाला बी हात लावला तर माझी मी माहेरी निघून येणार!’’ शिल्पा ठसक्यात बोलली.

तिचा नवरा फक्त हसला.

या शिल्पाच्या भेटीला दहा वर्षे उलटून गेली... विट्यात मी ‘मुक्तांगण’ वाचनालय सुरू केले. श्रेष्ठ साहित्यिक पु.ल.देशपांडे व सुनीता देशपांडे यांनी या वाचनालयास एक लाख रुपयांची देणगी 26 जानेवारी 1990 रोजी दिली. आम्ही वाचनालयाच्या संचालक मंडळींनी विटे शहरातून आणखी सात लाख रुपये जमवले. आठ लाखांची वाचनालयाची भव्य देखणी इमारत उभी केली.

साहित्यिक पु.ल.देशपांडे आणि मुंबईचे आमचे स्नेही कमलाकर म्हेत्रे (सी.ए.) यांच्या सूचनेवरून सुप्रसिद्ध साहित्यिक रवींद्र पिंगे आमच्या वाचनालयास भेट द्यावी, आमचे काम पाहावे; त्या निमित्ताने विट्याभोवतीचा परिसर पहावा, म्हणून आम्हाला कळवून विट्याला आले.

वाचनालयात त्यांचे व्याख्यान झाले. परिसरातील रेवणसिद्ध, खरसुंडीसिद्ध वगैरे तीर्थालये त्यांना दाखवली.

विट्यापासून जवळच देवराष्ट्रे नावाचे गाव आहे. तेथे स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मस्थान आहे. धों. म. मोहिते या स्वातंत्र्य सेनानींनी उभारलेले अभयारण्य आहे. रवींद्र पिंगेसरांना ते पहायचे होते. आम्ही एक जीप भाड्याने करून देवराष्ट्रे पहायला गेलो.

सागरेश्वर अभयारण्य, यशवंतराव चव्हाण यांचे (डॉ. पतंगराव कदम यांनी बांधलेले) स्मारक पाहून आम्ही यशवंतरावांचे घर पहायला गेलो. तिथे रस्त्याच्या कडेला वडाच्या मोठ्या झाडाखाली आमची गाडी उभी केली आणि आम्ही यशवंतराव

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

जन्मले ते घर पहायला गेलो. पिंगेसरांनी घराला साष्टांग नमस्कार घातला. म्हणाले, 'हिमालय वाचवायला सह्याद्री पर्वतासारखे धावून जाणारे, अफाट कर्तृत्व लाभलेले हे थोर पुरुष ज्या घरात जन्मले, ते घर पहायचा योग मला लाभला, हे माझे सद्भाग्य आहे.'

घर पाहून घराची माती कपाळाला लावून आम्ही परत गाडीजवळ आलो. तिथे चार तरुण हातात दांडकी घेऊन उभे होते. चौघांनीही 'टाकलेली' असावी. म्हणाले, ''ओ साहेब, कुणाची गाडी आहे? या गाडीखाली आमची कोंबडी घाऊन मेलीया. तिची भरपाई द्या, नाही तर आम्ही गाडी पुढे जाऊ देणार नाही.''

मी विचारले, कुठाय कोंबडी ?

त्यांनी एक मेलेली कोंबडी दाखविली. तिच्यातून लाल रक्त ठिबकत होते. पाहुण्यांच्या समोर तमाशा नको म्हणून मी म्हटले, किती पैसे द्यायचे बाबांनो?

ते म्हणाले, ''शंभर रुपये द्या.''

त्यावेळी शंभर रुपये जास्तच होते. तरीही काहीही न बोलता मी खिशातून पाकीट काढून शंभर रुपये देणार एवढ्यात कोपऱ्यातून एक जबरी आवाज आला–

''अहो गुरुजी, थांबा. पैसे देऊ नका...'' एक तरुण मुलगी जवळ आली. तिने बांगड्या मागे सारल्या आणि त्या तरुण मुलांना म्हणाली, ए भाड्यांनो... कुणाला पैसे मागता रे...? माहीत आहेत का हे कोण आहेत ते? हे माझे गुरुजी आहेत. मेल्यांनो, ही गुंडगिरी बंद करा... कोंबडी सकाळी मोटारसायकलखाली घाऊन मेलीया... लाल शाईची दौत कोंबडीवर ओतताहेत आणि सकाळपासून येईल ती गाडी अडवून पैसे उकळताहेत. गुरुजी याला पैसे देऊ नका. कडेगाव पोलिसांना फोन करा. अशाने परगावचा कोणी माणूस यशवंतराव साहेबांचं घर पाहायला यायचा न्हाय. पैसे काढतायत आणि दारू ढोसतायत...

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

त्या मुलीच्या या कडक शब्दांबरोबर ते चौघेही दारूडे कोंबडी घेऊन पळून गेले.

मी कृतज्ञतेने त्या माझ्या विद्यार्थिनीकडे पाहिले, ती दऱ्याबा चव्हाणाची शिल्पा होती.

म्हणाली, ''गुरुजी, माझ्या घराजवळ आला आहात, आता माझ्या घरी चला. इथे पलीकडेच मी राहते.''

शिल्पाच्या अचानक येण्याने, रणचंडिकेचे रूप धारण करून त्या पैसे मागणाऱ्या चार गुंडांना पळवून लावण्याने आम्ही भारावून गेलो होतो.

शिल्पाच्या घरी गेलो. तिने चार खोल्यांचे घर बांधून घेतलेले होते. ती, पती, दोन मुले, दीर, जाऊ, तिची दोन मुले, सासरे, सासू एवढे लोक त्यात राहत होते. नवरा आणि दीर जवळच्या ताकारी स्टेशनवर दुचाकी गाड्यांचे गॅरेज चालवत होते.

मी म्हटले, ''शिल्पा, तुझे चांगले चालले आहे ना?''

ती म्हणाली, ''गुरुजी, माझे फार चांगले चाललेले आहे, याला कारण तुम्ही आहात. तुम्ही शाळेत शिकवत होता– व्यसनांना जवळ करू नका, कष्ट करायला लाजू नका; मग पाहा – पैसाच पैसा मिळतो. त्याप्रमाणे वागते. नवरा, दीर, सासरा यांना दारूला शिवूही देत नाही. सासू–सासऱ्यांना आई–वडील मानले आणि जावेला धाकटी बहीण. त्यामुळे संसार गुण्यागोविंदाने चालला आहे.''

आम्ही सर्वांनी तिच्या घरी चहा घेतला आणि विटा गाव जवळ केले. कोल्हापूरच्या अंबाबाईसारखी सावळ्या रंगाची, मोठ्या डोळ्यांची शिल्पा आमच्या मनात घर करून राहिली होती.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

# अपठीत उतारा

## (1)

गुप्त सम्राटांच्या सैन्यव्यवस्थेत बराच बदल झाला होता. मौर्य सम्राटांची चतुरंगसेना आता फक्त तिरंगी होती; कारण रथाचा उपयोग या काळात बंद झाला होता. गजदल, अश्वदल आणि पददल ही तीन दले मात्र सर्व दृष्टींनी सुसज्ज होती. प्रत्येक दलाला स्वतंत्र अधिकारी असे. सैन्याला तनखा देण्याची पद्धत त्या वेळी रूढ होती.

गुप्तांच्या कारभाराची बरीच माहिती फाहियानच्या प्रवासवर्णनावरून आपल्याला मिळू शकते. त्याने तत्कालीन सुस्थितीचे बरेच कौतुक केले आहे. गुप्तांचा कारभार प्रजेला अतिशय सुखावह होत होता, असे तो म्हणतो. गुन्हे कमी होत आणि शिक्षेचे स्वरूपही सौम्य असे. फाशीसारख्या देहान्त शासनाचा क्वचितच उपयोग केला जात असे. न्यायदानाच्या बाबतीतही गुप्त सम्राटांची विशेष ख्याती होती. विक्रमादित्याचे न्यायासन हा दंतकथांचा आणि लोकसाहित्याचा आवडता विषय झाला होता. सर्व लोकांना देशात संचारस्वातंत्र्य होते. फाहियानसारख्या परदेशी प्रवाशांनासुद्धा देशाच्या कोणत्याही भागात हिंडता फिरता आले, सर्व प्रकारची माहिती गोळा करता आली; इतकेच नव्हे तर सर्वत्र त्यांचे हार्दिक स्वागत झाले, यावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) चतुरंग सेना कोणाची होती ?

2) चतुरंग सेना तिरंगी का झाली ?

3) कोणाच्या प्रवास वर्णनात गुप्तांच्या कारभाराची माहिती मिळते ?

4) गुप्तांचा कारभार कसा होता ?

## (2)

आळशी माणूस हा सतत आरामाची अपेक्षा करत असतो. तर खरा काम करणारा माणूस ''आराम हराम है'' असे मानतो. रात्रीची पाच-सहा तास झोप ही विश्रांतीसाठी पुरेशी असते. इतरवेळी त्याने सतत् काम करत राहावे. उगाचच बसून राहिल्याने अंगात आळस वाढतो. उलट प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, काळ सतत पुढे जात असतो. तो कोणासाठीही थांबत नसतो. आपण तो काळ व्यर्थ दवडला तर आपला कार्यभाग साधणार नाही. सतत तेच तेच काम करत राहिल्यास कंटाळा येतो. म्हणून तर सहा दिवस काम केल्यावर रविवारी सुट्टी येते. त्या दिवशी आळसात लोळत पडण्यापेक्षा माणसाने छंदात रमून जावे.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) आळशी माणूस व खरा कष्टकरी माणूस यातील फरक काय ?

2) काळ व्यर्थ जाऊ नये म्हणून माणसाने काय करावे ?

3) आळशी माणूस सतत कशाची अपेक्षा करतो ?

4) माणसाला किती झोप पुरेशी आहे ?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## (3)

'हुंड्यापायी स्त्रीची हत्या.'

'छळाला कंटाळून महिलेची आत्महत्या'

'मुलीची छेड काढणाऱ्यांना अटक'

अशी शीर्षके असलेल्या बातम्या वृत्तपत्रांतून नेहमीच दिसतात. आजच्या समाजात स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्यायाची यावरून कल्पना येते. पूर्वीही स्त्रियांचा छळ होत होताच; पण त्यास जाहीर वाचा फुटत नव्हती. आज ती फुटते. आजची स्त्री जागृत आहे, त्याचेच हे लक्षण नव्हे का ?

अर्थात ही जागृती पुरेशी नाही. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांचा कोंडमारा होतो, ही जाणीव आता तीव्र झाली आहे. याचे श्रेय म. फुले, आगरकर, महर्षी कर्वे, डॉ. आंबेडकर या समाजसुधारकांना आहे. रूढी आणि परंपरेच्या जोखडाखाली स्त्रिया भरडल्या जातात, या गोष्टीकडे समाजधुरीणांनी अथक प्रयत्नांनी लोकांचे लक्ष वेधले. शिक्षणामुळे नवी दृष्टी येते म्हणून जाणत्या लोकांनी स्त्रीशिक्षणाचा प्रसार केला. म. फुले यांनी आपल्या पत्नीस शिकवून शिक्षिका केले. म. कर्वे यांनी स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ काढले. त्यामुळे 'चूलखंडात' दुय्यम नागरिकत्वाचे जिणे कंठणाऱ्या स्त्रिया जागृत झाल्या. पुरुषवर्गासही आपल्या अरेरावीपणाची जाणीव झाली.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

1) वृत्तपत्रातून स्त्री विषयक कोणत्या बातम्या आलेल्या दिसतात?

2) हुंड्यामुळे कोणाची हत्या होते?

3) कोणत्या समाजसुधारकांनी स्त्री विषयक अत्याचाराला वाचा फोडली?

4) महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षण विषय कोणते कार्य केले?

## (4)

‘विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगामाजी’ या पद्यपंक्तीत माणसाच्या विकासाचे रहस्य सांगितले आहे. ही विद्या प्राप्त करण्याचा सोपा मार्ग म्हणजे ‘पाटीची संगत धरणे’, पाटीवर ‘श्रीगणेशाय नमः’ लिहून शिक्षणाचा श्रीगणेशा करणे. ‘शिक्षणावाचून तरणोपाय नाही’ असे महात्मा फुले यांनी सांगितले ते म्हणूनच होय.

माणूस साक्षर नसणे म्हणजे ‘डोळे असून आंधळे’ अशी स्थिती. अशा आंधळेपणाने या जगात वावरणे तापदायक आहे. आजचे युग विज्ञानाचे आहे. त्यामुळे लिहिणे, वाचणे, थोडी फार आकडेमोड करता येणे या गोष्टी प्रत्येक माणसाला आवश्यक आहेत. न पेक्षा रोजच्या जीवनातही माणसाची फजिती होण्याचा संभव आहे.

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

****